स्वादमय सेवेचा • राजस्थानी थाळी •
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर फोन: 2327060, 9850799850

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा नूतनी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. २०.०९.२०२४ | अंक नं. १७१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आरक्षणासाठी मराठा बांधवांचे नगरमध्ये 'अन्नत्याग आंदोलन' सुरु

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे अंतरवली सराटी येथे आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या समर्थनार्थ नगर तहसील कार्यालयासमोर गोरख दळवी (रा.सोनेवाडी), संतोष आजबे (रा.गजानन कॉलनी, नवनागापूर) आणि सखाराम गुंजाळ (रा.बाराबाभळी) या ३ मराठा बांधवांनी शुक्रवारी (दि.२०) दुपारपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी त्यांची मागणी आहे. त्यांच्या अन्न त्याग आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी नगर शहर व तालुक्यातील बांधव उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

तर नगर विधानसभा मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढतीसाठी भाजपची तयारी

शहरातील पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या बैठकीचे २१ सप्टेंबर रोजी नगरमध्ये आयोजन

नगर – अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघ स्वतःकडे ठेवण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू आहे. महायुतीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी–कार्यकर्त्यांनी शहर मतदारसंघावर यापूर्वीच दावा केला असून, कसल्याही परिस्थितीत मतदारसंघ पक्षाकडे घ्यावा, अशी आग्रही मागणी वरिष्ठांकडे लावून धरली आहे. जागावाटपात नगर शहर मतदारसंघ भाजपकडे घेणे शक्य नसेल तर मैत्रीपूर्ण लढतीला परवानगी द्यावी, असाही एक प्रस्ताव स्थानिक पदाधिकारी–कार्यकर्त्यांनी ठेवला आहे. याच अनुषंगाने भाजपच्या शहरातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची महत्त्वाची बैठक २१ सप्टेंबर रोजी होणार असल्याची माहिती मिळाली आहे.

महायुतीच्या जागावाटपात नगर शहर मतदारसंघ विद्यमान आमदार या नात्याने राष्ट्रवादीकडे जाणार हे निश्चित असून, आ. संग्राम जगताप यांनाच उमेदवारी मिळणार हे स्पष्ट आहे. असे असताना महायुतीतील घटकपक्ष असलेल्या भाजप आणि शिवसेने (शिंदे) कडेही इच्छुकांची संख्या आहे. विशेषतः भाजपकडे इच्छुक उमेदवार तुलनेने अधिक असून, त्यांनी मतदारसंघ भाजपकडे घ्यावा, असा आग्रह वरिष्ठांकडे धरला आहे. शहरात भाजपला मानणारा मतादारवर्ग मोठा आहे. त्याचबरोबर पक्षकार्यकर्त्यांचे जाळेही मा ठे आहे. त्याचा फायदा निवडणुकीत पक्षाच्या उमेदवाराला निश्चित होईल, असा दावा केला जात आहे. त्यामुळे पक्षाच्या मंडलाच्या बैठकांमध्ये शहर मतदारसंघावर वारंवार दावा करून तसे ठरावही घेण्यात आले आहेत. मात्र त्यास पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. वरिष्ठ नेत्यांवर दबाव वाढविण्याच्या दृष्टीने आणि पक्षाने मतदारसंघात निवडणुकीची केलेली तयारी तसेच भविष्यात विजयासाठीची जुळवली जाणारी गणिते यावर विचारमंथन करण्याच्या दृष्टीने भाजप कार्यकर्त्यांची बैठक शनिवारी (दि. २१) आयोजित केली असल्याचे सांगण्यात आले.

शहर मतदारसंघ भाजपकडे घ्यावा अथवा ते शक्य नसेल तर मैत्रीपूर्ण लढतीस परवानगी द्यावी, अशी भूमिका कार्यकर्ते मांडत असल्याने वरिष्ठ पातळीवरून काय निर्णय होतोय, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या वादातून जमावाचा हॉटेल व्यावसायिकावर तलवार, कोयत्याने हल्ला

नगर – गावात गणेश विसर्जन मिरवणुकीत २ गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये डी जे मागे पुढे घेण्यावरून झालेल्या वादानंतर एका मंडळाच्या १४ ते १५ जणांच्या जमावाने दुसऱ्या मंडळातील वाद घालणाऱ्या तरुणाला हॉटेल मध्ये लपवून ठेवल्याच्या संशयावरून हॉटेल व्यावसायिकावर तलवार कोयत्याने वार करत त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद येथे गुरुवारी (दि.१९) रात्री घडली.

या हल्ल्यात हॉटेल व्यावसायिक मनोज उर्फ दत्तात्रय बाजीराव चोभे (वय ३८, रा. बाबुर्डी बेंद, ता.नगर) हा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्या उजव्या हाताचा अंगठा तुटला आहे. त्याने नगरमधील खाजगी दवाखान्यात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी दिपक साळवे, राम साळवे, लखन साळवे, साहेबराव कोंडाजी साळवे, शिवाजी गबाजी साळवे, शिवराज अशोक इंगळे (रा. बाबुर्डी बेंद, ता.नगर), किरण कांबळे, प्रविण कांबळे (रा. आरणगाव, ता.नगर) व त्यांच्या सोबत आरणगावचे ७ ते ८ अनोळखी इसम अशा जणांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, १८९ (२), १९१ (२)(३), १९०, आर्म ॲक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यावर यातील साहेबराव कोंडाजी साळवे, शिवाजी गबाजी साळवे, शिवराज अशोक इंगळे या ३ आरोपींना पोलिसांनी शुक्रवारी (दि.२०) पहाटे ४ च्या सुमारास अटक केली आहे.

बाबुर्डी बेंद गावातील गणेश मंडळांनी गणेश विसर्जन मिरवणूक गुरुवारी (दि.१९) सायंकाळी काढली होती. गावातील २ मंडळांनी मिरवणुकीसाठी डी जे लावले होते. मिरवणूक सुरु असताना डी जे मागे पुढे घेण्यावरून दोन मंडळातील कार्यकर्त्यांमध्ये २–३ वेळा वाद झाले. ते मिटलेही होते. मात्र मिरवणूक संपल्यावर एका मंडळाच्या काही कार्यकर्त्यांनी दुसऱ्या मंडळाच्या कार्यकर्त्यांना मारण्यासाठी आरणगाव वरून युवक बोलावले. ही माहिती मिळताच तो कार्यकर्ता पसार झाला.

त्याचा शोध घेत हे १४ – १५ जणांचे टोळके फियांदी मनोज चोभे याच्या बाबुर्डी फाट्यावर नगर – दौंड रोडवर असलेल्या हॉटेल राजवीर येथे गेले. तेथे त्यांनी चोभे यांना तू पोरं का लपवून ठेवली आहेत. त्यांना बाहेर काढ नाहीतर तुला जीवे ठार मारू अशी धमकी दिली. त्यावरून त्यांच्यात वाद झाले. तेव्हा आरोपी दीपक साळवे याने चोभे वर कोयत्याने वार केला. तर किरण कांबळे, प्रविण कांबळे यांनी हातावर तलवारीने वार केला.

त्यात चोभे याच्या उजव्या हाताचा अंगठा तुटला तर डाव्या हातावर गंभीर जखमा झाल्या. यावेळी यातील इतर आरोपींनी लोखंडी रॉडने मारहाण करत याला जिवंत ठेवू नका मारून टाका असे म्हणत शिवीगाळ केली. या हल्ल्यात फियांदी चोभे जखमी होवून खाली पडल्यावर सर्वजण तेथून पळून गेल्याचे फियांदी चोभे यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हंटले आहे.

दरम्यान या घटनेची माहिती मिळताच नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते, उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हे पोलिस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी तसेच जखमी उपचार घेत असलेल्या रुग्णालयात भेट दिली. त्यानंतर आरोपींना पकडण्यासाठी मोहीम राबवत पहाटे ४ वाजे पर्यंत ३ आरोपींना पकडले आहे.

थकबाकीदार कर्जदारांना आरोपींच्या यादीत सहभागी करावे व पैसे भरल्याशिवाय त्यांना जामीन देऊ नये, या मागणीचे निवेदन जिल्हा पोलिस अधीक्षकांना ठेवीदारांचेवतीने देण्यात आले.

'नगर अर्बन'च्या थकबाकीदारांचा आरोपींच्या यादीत समावेश करा

कर्ज रक्कम भरत नाही तोपर्यंत जामीन देऊ नका, बँक बचाव समितीचे निवेदन

नगर – नगर अर्बन को–ऑप. बँकेच्या थकबाकीदार कर्जदारांना आरोपींच्या यादीत टाकून त्यांच्यावर कारवाई करावी, तसेच त्यांनी थकबाकीची रक्कम भरल्याशिवाय त्यांना जामीन मंजूर करू नये, या मागणीचे निवेदन बँक बचाव समितीच्यावतीने शुक्रवारी (दि. २०) जिल्हा पोलिस अधीक्षकांना देण्यात आले आहे.

बँक बचाव समितीचे सदस्य डी. एम. कुलकर्णी यांनी सदर निवेदन दिले आहे. यावेळी राजेंद्र गांधी, विलास कुलकर्णी, डॉ. राजळे, श्रीमती सुमन जाधव, श्रीमती भाकरे, श्री. पावशेरे, श्री. नजन, डॉ. आघाव यांच्यासह समितीचे सदस्य, ठेवीदार उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, नगर अर्बन बँकेच्या घोटाळ्यात मोठमोठ्या रकमांचे कर्ज घेणारे धनदांडगे कर्ज थकबाकीदारांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. तथापि कर्जदार हे राजकिय धनशक्तीशी संबंधित असून, कर्ज वसुली प्रक्रियेत प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे बँकेच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवीच्या रकमा सध्या मिळू शकत नाहीत त्यामुळे ठेवीदारही आता हतबल झालेले आहेत.

नुकत्याच ठेवीदारांच्या बैठकीत त्यांच्या ठेव रकमा लवकर मिळवण्यासाठी आता कर्जदारांच्या मागे लागण्याचा निर्णय झाला आहे. कर्जाची वसुली होण्यासाठी कर्जदारांवर पोलीस कारवाई होणे आवश्यक आहे. त्यासाठी कर्जदारांची अद्यायावत यादी पोलीस प्रशासनाकडे देण्यात आली.

या यादीतील सर्व कर्जदारांना शक्य तितक्या लवकर आरोपी जाहीर करून त्यांच्यावर विनविलंब पोलीस कारवाई करावी, जेणेकरून कर्जदारांमध्ये पोलीस कारवाईची भिती निर्माण होऊन कर्जवसुली होण्यास मदत होईल.

बँक बचाव समितीच्या वतीने बँकेतील पाच सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या 'घराचे उतारे' आपणाकडे सादर केलेले आहेत. त्याआधारे या अधिकाऱ्यांच्या प्रॉपर्टीची म्हणजे घराची जप्ती कारवाई होऊन अशी नोटीस त्यांच्या घरावर लावावी, जेणेकरून हे फरार अधिकारी शोधण्यास पोलीस प्रशासनास मदत होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

दिप : मुव्ही–शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक : 20 सप्टें. ते 27 सप्टें. 2024
नवरा माझा नवसाचा | युद्रा | तुंबड | स्त्री–२ | द टेस्टर्स ऑफ अॅलं टाईम्स | कहां शुरू कहां खतम
AM 09.00 | 11:45 — AM 08:45 | 11:50 — AM 11:25 — AM 08:30 — PM 07:15 — PM 00:15
PM 03:30 | 06:45 | 07:30 | 10:15 — PM 04:30 | 10:45 — PM 05:15 | 10:30 — PM 01:45 | 07:40
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
book@show CONNPLEX book@show
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
6353564618 / 7790094001

संकष्ट चतुर्थी स्पेशल टक्कर हमदासासाठी
शनिवार दि.२१ सप्टेंबर चंद्रोदय ०८.५६.मी.
काजू- पॅटीस, शाबुदाणा वडा, कैलास उडपी
उपवासाची स्पेशल मलाई लस्सी
दिवाणी अर्बाटर्स, क्विस गली,मिरजबाग,अ.नगर

बाई पाहिजे
अ.नगर व मुंबई येथे घरकामासाठी वय १८ ते ४० वयाची मुलगी पाहिजे जी व्यक्ती काम करणार त्यांची राहण्याची सोय केली जाईल.
8888576576

बाई पाहिजे
स्वयंपाक करण्यासाठी सकाळ व संध्याकाळी
9422221505

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायात मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
वारशीत सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिवीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर सेल दुपारी १ ते ५ या वेळेत

वाढलेल्या वजनाने त्रस्त आहात? वजन कमी करणे झाले सहज शक्य
7020025541

मॅककेअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
जागतिक तंत्रज्ञान आता प्रथमच आपल्या शहरात...
गुडघेबदल आणि सांधेबदल झाले अधिक सोपे !!!
रोबॉटिक सर्जरी आता मॅककेअर हॉस्पिटल, अहमदनगर येथे उपलब्ध...
अचूकता
कमीत कमी वेदना
उत्कृष्ट परिणामकारकता
ROSA
अधिक माहितीसाठी संपर्क करा : मॅककेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, अहमदनगर
9823 852 852

।। श्री कुलस्वामीनी प्रसन्न ।।
गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
श्री तिरुपती बालाजी
दर्शनसह श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनसह कोल्हापूर महालक्ष्मी
मतुरा दि. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० गोकुळ २०२४ बुधवार दि. १५ पुणे पाचूर सुरु (मर्यादित सिट्स)
* दर्शनीय स्थळे *
श्री तिरुपती बालाजी * चेन्नाराज * अडकमोरा * स्वामी नुकुल (अरोग्य * सिद्ध टेम्पल * गोविंदराज स्वामी टेम्पल * पद्मावती हाराम टेम्पल * श्री कपिलेश्वरी स्वामी टेम्पल * कोलाकुलू पाडाकमी
* प्रतिव्यक्ती *
₹ 6501/-
* समाविष्ट भोजनी *
हॉटेल रिसोर्ट (३, ४ स्टारीमध्ये) नाश्ता, चहा, नाश्ता, रोज रात्री बॉलर (३ ५०० मिनीट) कुलर व्यवस्थाही जेवण कुलरचे व मनोरंजन उद्यान, विसरा अवतार सिद्ध रोपवेसह, ट्रॉफ पास
* ऑफिस *
Anna Travel Holidays & Multiple services
नगर : मो. 9226399555 / 9657746555 | कामगार : मो. 9595156999
पुणे : मो. 9168055159 / 9819027017 | वडगाव : मो. 7030034041 / 9423471413
पाचोरा : मो. 9822281125 / 8149324403

।। कुलस्वामीनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातुन
दरवीज
■ नगर वेषून स. ७,८,९ व दुपारी २.०० ■ पुणे वेषून स.३,१२,२. व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
विश्वास पॉइंट -पिसाळ चौक,शोरुमी कॉर्नर, शास्त्री प्लिंटिंग, दत्त प्लेस चौक,कामगीर चौक,वेडगव
पुणे ट्रॉव - सावंतो, सावरी सायबाबा टेम्पल, नवीन शिवाजीनगर बसस्टॉज
कृष्णा आशापाक
अमर–प्रेम हॉलिडेज,
ऑफिस– चितळकोपर,अ.नगर
9657746555/ 9226399555

EARTH'S Green Library
Greenery For Every Space
Fresh Environment with Indoor Plants
Get a Plant Today!
• Potted Planters
• Premium Planters
• Garden Accessories
• Garden Furniture
• Garden Lightings
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंढेचा

email - navamaratha@gmail.com

उच्च शिक्षणाचे वास्तव- संदीप वाकचौरे शिक्षणतज्ञ

देशातील महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करणाऱ्या नॅशनल इन्स्टिट्यूट रँकींग प्रेमवर्क या संस्थेच्या ताज्या यादीमध्ये महाराष्ट्रातील एकही विद्यापीठ पहिल्या दहा क्रमांकामध्ये नसावे, ही फार खेदाची बाब आहे.

एकेकाळी नावाजलेले मुंबई विद्यापीठ पहिल्या शंभरमध्येही नसणे, पुणे विद्यापीठ ३७ व्या स्थानात जाणे, या बाबी अधिक चिंताजनक आहेत. विद्यापीठांबरोबरच महाविद्यालयांची स्थितीही अशीच आहे.

महाविद्यालयांच्या कामगिरीचा विचार करता त्यांची स्थिती अधिक चिंताजनक आगतिक बनली. जग आज ज्ञानमय अर्थव्यवस्थेचा विचार करत आहे. आपल्यालाही जागतिक महासत्तेची आस लागलीय. अशावेळी शिक्षण, संशोधनाची स्थिती अधिक

प्रगतीदायक, समाधानकारी असणे गरजेचे आहे. सरकारी व्यवस्था गुणवत्तेहून महणतांना उच्च शिक्षणाला खाजगी संस्थांचा दबदबा तर सोडा लक्ष्यवेधक स्थानही नाही. अनेक ठिकाणी निर्माण झालेल्या शिक्षण सम्राटांनी राष्ट्रनिर्मितीपेक्षा अर्थ व सत्तानिर्मिती पाहिली. त्यांनी ही अवस्था अधिकच चिंताजनक करून ठेवली आहे. मुळात शैक्षणिक उद्दिष्ट नितीमत्ता, राष्ट्र व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास या गोष्टी बाजूला पडत हा प्रवास चाललाय...

सोशल मीडियावर चॅटींग व्हायरल करण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीकडून तरुणाने उकळला ७ लाखांचा ऐवज

नगर - गरेज मध्ये काम करणाऱ्या तरुणाने १३ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत ओळख वाढवून व नंतर त्यांनी सोशल मीडियावर केलेली चॅटींग व्हायरल करण्याची धमकी देत त्याने त्या मुलीकडून सुमारे ११ तोळ्यांचे दागिने व रोकड असा ७ लाख ५० हजार रूपयांचा ऐवज उकळला. तसेच तिला व्हॅक्ट घेऊन जात तिच्या सोबत अश्लिल चाळे केल्याची घटना समोर आली आहे. उपनगरात राहत असलेल्या पीडित मुलीच्या वडिलांनी गुरुवारी (दि.१९) दुपारी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या प्रकरणी रहेान राजु शेख (रा. तपोवन रस्ता, सावेडी) याच्यावरिरूध्द विनयभंग, पोस्को आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. पिडीत अल्पवयीन मुलीचे व्यावसायिक आहेत. ते एक दिवस आपल्या मोबाईलच्या फोन पे मधील ट्रांजेक्शन तपासत असताना त्यांना काही संशयास्पद व्यवहार दिसून आले. त्यांनी याबाबत पत्नी कडे विचारणा केली असता घरातील कपाटाची चावी सापडत नसल्याचे पत्नीने त्यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी फर्निचर वाल्याकडून कपाट उघडून घेतले असता त्यांना त्यात ठेवलेले दागिने दिसून आले नाहीत. याबाबत त्यांनी मुलीला विश्वासात घेत चौकशी केल्यानंतर मुलीने धक्कादायक माहिती त्यांना सांगितली.

फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी क्लासला जात असताना एका मेक्नॅनिक दुकानात काम करत असलेला रेहान तिचा पाठलाग करत होता. दोन ते तीन महिन्यांपासून ते सोशल मीडियावरील इंस्टाग्रामवर बोलत होते. दि.२८ ऑगस्ट रोजी सायंकाळी सावेडी उपनगरातील एका व्हॅक्ट त्यांची भेट झाली तेव्हा रहेान याने मुलीसोबत अश्लिल चाळे केले होते. दि.९ सप्टेंबर रोजी सायंकाळी रेहान याने मुलीला 'माझी आई आजारी आहे, माझ्या घरी कोणी नाही, तु तुझ्या वडिलांना न सांगता मला पैसे दे, तु मला पैसे दिले नाही तर तुझी व माझी इंस्टाग्राम चॅटींग मी तुझ्या आई-वडिलांना पाठविन' अशी धमकी दिली होती.

धमकीला घाबरून पीडिताने वडिलांच्या मोबाईलवरुन रेहानला पैसे पाठविले. त्याने पुन्हा पैसे व घरातील दागिन्यांची मागणी केली असता पीडिताने तिच्या आईचे कपाटात ठेवलेले गंठण, टॉप्स, अंगठी, तीन नथा, दोरा गंठण, चैन असे सुमारे ११ तोळ्यांचे सोन्याचे दागिने रूमालात बांधून घराच्या बालकनीतून रेहानला दिले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादी करण पोलिसांनी आरोपी रेहान शेख याच्या वर गुन्हा दाखल केला. या गुन्हाचे तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे व त्यांच्या पथकाने आरोपी रेहान याला अटक केली आहे.

किरकोळ वादानंतर दोन गटात भिंगार शहरामध्ये हाणामारी

परस्परविरोधी फिर्यादीवरून दोन्ही गटाच्या १५ ते २० जणांवर गुन्हे दाखल

नगर - भिंगार उपनगरात बुधवारी रात्री दोन गटात किरकोळ कारणातून वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना घडली. यात तिघे जखमी झाले आहेत. या प्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

केतन सुधाकर गोवेकर (वय ३१, रा. दाणेगल्ही, भिंगार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओंकार वाघस्कर, विनायक वाघस्कर, योगेश करंडे, सत्यम पावले, टिंकु भालसिंग व अनोळखी पाच ते सहा महिला (सर्व रा. वाघस्कर गल्ही, भिंगार) यांच्यावरिरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रॉली कोणाला विचारून घेतली असे म्हणत संशयित आरोपींनी केतन गोवेकर यांना बुधवारी (दि.१८) रात्री साडेबारा वाजता दाणेगल्ही चौकात शिवीगाळ करत दगड व लाथाबुक्कयांनी मारहाण करून जखमी केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

विनायक दत्तात्रय वाघस्कर (वय ५२, रा. वाघस्कर गल्ही, भिंगार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अक्षय संजय हंपे (रा. सौरभनगर, भिंगार), दिनेश रणदिवे (रा. दाणेगल्ही, भिंगार), आनंद शेंडगे (रा. सारस्वतनगर), केतन गोवेकर (रा. डबकर गल्ही, भिंगार), अभिषेक हंपे (रा. वाघस्कर गल्ही, भिंगार), भरत अंजीर (रा. रंगार गल्ही, भिंगार), आकाश रणदिवे (रा. दाणेगल्ही, भिंगार), विवेक शेंडगे (रा. सारस्वतनगर) यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सत्यम पावलेचे घर दाखविले नाही म्हणून संशयित आरोपींनी विनायक वाघस्कर यांना फायटरने, त्यांचा मुलगा संदेश यांना काठीने मारहाण करून जखमी केले. घरासमोर लावलेल्या वाहनाची तोडफोड केली. सत्यम पावलेच्या घरी जावून त्यांच्या आईला शिवीगाळ, दमदाटी केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

जाहिरात एजन्सीने लावलेला फलक फाडला

नगर - शहरात एका जाहिरात एजन्सीने लावलेला जाहिरात फलक अज्ञात व्यक्तीने फाडून नुकसान केल्याची घटना गवळी वाडा, लालाटाकी परिसरात घडली. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोहन अनिल बोरा (रा. बालिकाश्रम रोड, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची इलिमेंट मिडिया सोल्युशन कंपनी नावाची जाहिरात एजन्सी आहे. सदर एजन्सी मार्फत शहरात ठिकठिकाणी परवानग्या घेवून जाहिरात फलक व मोठे होर्डिंग लावले जातात. त्यांच्या एजन्सीने लालाटाकी परिसरात गवळीवाडा भागात एक जाहिरात फलक लावला होता. अज्ञात व्यक्तीने तो मंगळवारी (दि.१७) दुपारी फाडून टाकत नुकसान केले. या पूर्वीही अशा घटना घडल्या असल्याने रोहन बोरा यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस प्रशासन कारवाई करत नसल्याने पीडीत कुटुंब महात्मा गांधी जयंतीदिनी सामुदायिक आत्मदहन करणार

नगर - अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन पीडीत मुलीच्या कुटुंबीयांचे छपराचे घर पेटविणाऱ्या आरोपींवर पोलीस प्रशासन कारवाई करत नसल्याने पीडीत कुटुंबीयांनी महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी सामुदायिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या गुन्हातील आरोपींपासून जीवाना धोका असून, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी घरकुल मिळण्याच्या मागणीचे निवेदन पीडीत कुटुंबीयांनी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना दिले.

कर्जत तालुक्यात पीडित कुटुंबीय राहत असून, शेतमजुरी व्यवसाय करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. त्यांच्या १३ वर्षीय शाळकरी मुलीचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी सन २०२२ मध्ये कर्जत पोलीस स्टेशनला अपहरण, बलात्कार, बालकांचे लैंगिक अत्याचार व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यानुसार गुन्हा दाखल झालेला आहे.

घर पेटविणाऱ्या आरोपीवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना देताना पिडित कुटूंबीय.

हा गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपींकडून दबाव आणला जात आहे. ३० एप्रिल २०२४ रोजी रात्री आरोपींनी पिडीत कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या उद्देशाने राहत असलेल्या छपराचे घर पेटवून दिले. वेळीच कुटुंबातील सदस्यांना आग लागल्याचे कळाल्याने सर्व सदस्य सुखरुप बाहेर पडले. मात्र घरातील संसार उपयोगी जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाले.

या प्रकरणी देखील आरोपींवर पिडीत कुटुंबीयांनी गुन्हा दाखल केलेला आहे. आरोपींकडून पीडित कुटुंबीयांच्या जिवीतला धोका असून, आरोपींवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे असताना देखील त्यांच्यावर पोलीस प्रशासन कारवाई करत नसल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे.

आर्थिक दुर्बल व मागासवर्गीय असल्याने प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असून, घर जळाल्याने उघड्यावर जीवन जगावे लागत असताना प्रशासनाने न्याय देऊन घरकुल उपलब्ध करुन कुटुंबाचे पुनर्वसन करण्याची मागणी पीडित कुटुंबीयांनी केली आहे. अन्याय कर्जत प्रांत कार्यालय परिसरात महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर जीवनात यश संपादन करा

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे प्रतिपादन, प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाचा पदवीदान समारंभ

नगर - जीवनात अनेक समस्यांना सामोरे जातांना न डगमगता आत्मविश्वास, कठोर परिश्रम आणि पूर्ण क्षमतेने कार्य केल्यास यश संपादन करता येईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केले.

लोणी बु. येथील प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाच्या १८ व्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, पद्मश्री सावजी ढोलकीया, विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, कुलगुरू डॉ.व्ही.एन.मगरे, संस्थेचे विश्वस्त सुवर्णा विखे पाटील, मोनिका सावंत, ध्रुव विखे पाटील, कुलसचिव डॉ. अरुणकुमार व्यास आदी उपस्थित होते.

स्नातकांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन राज्यपाल म्हणाले, अनेक महापुरुषांच्या जीवनात आव्हानाचे प्रसंग आलेत, त्यांनी आत्मविश्वासाने त्यावर मात करुन उज्ज्वेल गाठले. स्नातकांनी सेवा भावनेने कार्य करताना स्वतःवरचा विश्वास ढळू देऊ नये. आपल्या यशासाठी आई-वडिलांनी परिश्रम घेतले आहेत हे न विसरता त्यांच्याविषयी कायम श्रद्धा मनात बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले.

श्री. राधाकृष्णन पुढे म्हणाले, लोणीसारख्या ग्रामीण भागात सामाजिक बांधिलकी आणि समर्पित कार्याच्या बळावर प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठासारखी संस्था उभी राहू शकते हे संस्थेसाठी झटणाऱ्या स्व.विठ्ठलराव विखे पाटील आणि स्व.बाळासाहेब विखे पाटील यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य सेवा देण्याचे विद्यापीठाचे कार्य इतरांना मार्गदर्शक आहे.

वर्षभरात दहा लाख नागरिकांना उपचार देण्याचे संस्थेचे कार्यदेखील उल्लेखनीय आहे. सामान्य कुटुंबीयातून आलेल्या विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण विद्यापीठात देण्यात येते. सेवाभावनेने काम करणारे डॉक्टर्स येथून तयार होतात. विद्यापीठाने रुग्णावर उपचार करण्यासाठी बहुशाखीय दृष्टिकोन स्वीकारला आहे आणि अवयव प्रत्यारोपणसारख्या सुविधा इथे उभारण्यात येत आहेत. संस्थेची प्रगती खरोखर कौतुकास्पद असल्याचे राज्यपाल म्हणाले.

लोणी बु. येथील प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाच्या १८ व्या पदवीदान समारंभात महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, पद्मश्री सावजी ढोलकीया, विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, कुलगुरू डॉ.व्ही.एन.मगरे, संस्थेचे विश्वस्त सुवर्णा विखे पाटील, मोनिका सावंत, ध्रुव विखे पाटील, कुलसचिव डॉ. अरुणकुमार व्यास आदी. दुसऱ्या छायाचित्रात कुलगुरू मगरे यांनी डॉ.व्ही.एन.मगरे यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला.

सामाजिक बांधिलकीतून आरोग्य सेवा देण्याचे कार्य-मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

मंत्री ना. विखे पाटील म्हणाले, प्रवरा आरोग्य विद्यापीठाच्या माध्यमातून सेवा कार्य सुरू आहे. स्व. बाळासाहेब विखे पाटील यांनी सामाजिक जबाबदारी म्हणून ग्रामीण भागात माफक आरोग्य सेवा देण्याचे कार्य केले. त्यांची प्रेरणा घेऊन विद्यापीठाचे कार्य सुरू असून सामाजिक बांधिलकीने समाजाच्या प्रत्येक घटकाला सेवा देण्याचे कार्य होते आहे. समर्पण, सामाजिक उत्तरदायित्व, सेवा कार्याची परंपरा प्रवरा आरोग्य विद्यापीठ पुढे नेत आहे, असे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय क्षेत्रात काम करतांना विद्यार्थ्यांनी नवीन संशोधनावर भर देऊन त्याचा समाजासाठी उपयोग करावा असे विद्यार्थ्यांना आवाहन करुन श्री.विखे पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पद्मश्री सावजी ढोलकिया यांनी सामाजिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केल्याचेही ते म्हणाले.

पद्मश्री ढोलकीया म्हणाले, तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी मोठे यश संपादन करू शकतात. विद्यार्थ्यांनी आपण सर्वोत्तम असल्याचा आत्मविश्वास बाळगावा. मी कोणत्याही परिस्थितीत उद्दिष्ट गाठू शकतो, ईश्वर चांगले प्रयत्न करणाऱ्याच्या सोबत असतो, मी विजेता आहे हा विचार मनाशी बाळगा. मागचे अपयश विसरून वर्तमानात विजेत्याचा आत्मविश्वास बाळगून काम करा. नशिबावर अवलंबून न राहता विश्वासाने काम केल्यास यश संपादन करता येते. सेवा ही सर्वोत्तम गुंतवणूक असून त्याआधारे सर्वोत्तम यश मिळविता येईल, असा प्रेरक संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

मिळालेला सन्मान जबाबदारी म्हणून स्विकारत असून अधिक चांगले कार्य करण्याचा प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कुलपती डॉ.राजेंद्र विखे पाटील म्हणाले, ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आरोग्य सुविधा देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. त्यासाठी अशा भागात सेवा देणारे कुशल वैद्यकीय अधिकारी घडविण्याचे कार्य विद्यापीठ करीत आहे.

कुलगुरू मगरे यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रवरा विशेषोपचार रुग्णालय आणि अवयव प्रत्यारोपण केंद्राचे ऑनलाईन भूमिपूजन करण्यात आले. त्यांच्या हस्ते पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री सावजी ढोलकीया यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' या मानद उपाधीने सन्मानित करण्यात आले. पदवीदान समारंभात ९ स्नातकांना पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली, तर विशेष गुणवत्ता प्राप्त १३ स्नातकांना सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले. ९४९ पदवी आणि पदव्युत्तर स्नातकांना यावेळी पदवी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरूवात दीक्षांत संचलनाने झाली. कार्यक्रमाला कार्यकारी परिषदेचे सदस्य, विविध विद्याशाखेचे अधिष्ठाता, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

बुऱ्हाणनगर येथे गळफास घेत एकाची आत्महत्या

नगर - राहत्या घरात एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथे घडली. सुनील रामचंद्र खारगे (वय ५१, रा. आकांक्षा कॉलनी, बुर्हाणनगर) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी मिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सुनील खारगे यांनी बुधवारी (दि.१८) दुपारी राहत्या घरी छताच्या सिलींगच्या लोखंडी हुकाला कापडी पंचाच्या सहाय्याने गळफास घेतला. सदरचा प्रकार नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्वांना उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल केले. तेथील डॉ. बटुळे यांनी त्यांची तपासणी करून मयत झाल्याचे सांगितले. तशी माहिती त्यांनी रूग्णालयात नेमणूकीस असलेल्या पोलिसांना दिली. पोलिसांनी दिलेल्या खबरीवरून मिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार महेश विधाते करत आहेत.

जनार्दन जावळे यांचे निधन

नगर - कायनेटिक चौक येथील रहिवासी जनार्दन तुकाराम जावळे (कुकाणा) (वय ५८) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन भाऊ, एक बहिण, पुतणे, पुतणी असा परिवार आहे. त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अत्यंत धार्मिक व मनमिळाउ स्वभावाचे होते. त्यांना सामाजिक कार्याची आवड होती.

बंद घर फोडून चोरी; दागिन्यांसह रोकड लंपास

नगर - धार्मिक कार्यक्रमासाठी घराला कुलूप लावून बाहेर गेलेल्या कुटुंबाचे घर अज्ञात चोरट्यांनी फोडून घरातील कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेली १ तोळ्याची सोन्याची अंगठी व २५ हजाराची रोकड असा ५५ हजाराचा ऐवज चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील देऊळगाव सिध्दी येथे घडली.

या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात बुधवारी (दि.१८) दुपारी घरफोडीची गुन्हा दाखल झाला आहे. रावसाहेब दगडू वाघमोडे (वय ५६ रा. देऊळगाव सिध्दी) यांनी फिर्याद दिली आहे. सदरची घटना मंगळवारी (दि.१७) रात्री ९ च्या सुमारास घडली. गावात धार्मिक कार्यक्रम असल्याने वाघमोडे व त्यांचे कुटुंबीय घराला कुलूप लावून कार्यक्रमाला गेले होते. त्यावेळी चोरट्यांनी ही घरफोडी केली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार शिवाजी माने करत आहेत.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरकारभाराची चौकशी करुन कारवाई करावी

अॅड. सुरेश लगड यांची मुख्यमंत्री व सहकार मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने राज्य सहकारी बँकेत ठेवलेल्या मुदत ठेवी जवळपास एक हजार कोटींनी घटल्या आहेत. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने राज्य सहकारी बँकेतून एवढ्या मोठ्या रक्कमा कशासाठी काढल्या, काढलेल्या ठेवींचा विनियोग कशासाठी केला ? या ठेवी काढल्याने अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या लिक्विडीटीवर परिणाम झाला आहे. ही बाब गंभीर असून बँकेने ओव्हर ट्रेडींग केलेले आहे. त्यामुळे या प्रकरणाची मुख्यमंत्री व सहकार मंत्री यांनी चौकशी करावी. तसेच जिल्हा बँकेत ७०० पदांच्या भरतीचे कामही संशयास्पद होत आहे. मोठा गैरव्यवहार या कामात चाललेला आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चाललेल्या गैरकारभाराबाबत चौकशी करून कडक कारवाई करण्याचे निवेदन बँकेचे ज्येष्ठ सभासद व विशेष सरकारी वकील सुरेश लगड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे यांना पाठवलेल्या निवेदनात केली आहे.



आशिया खंडात नावाजलेली बँक म्हणून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ओळखली जाते. या बँकेच्या चाललेल्या कार्यपद्धतीवर सहकार खात्यानेच खुद्द अनेक प्रश्न उपस्थित केलेले असल्याने खरोखरच जिल्हा सहकारी बँकेच्या पारदर्शक कारभाराचे अनेक अपारदर्शक मुद्दे सहकार खात्याने उजेडात आणल्याचे नुकतेच उघड झाल्याचे दिसून येते.

बँकेच्या भरतीमध्ये गैरप्रकार /घोटाळे होवू नये म्हणून या बँकांची नोकर भरती केवळ ऑनलाईन पदधतीने राबविण्याचे धोरण सहकार विभागाने घेतले. जिल्हा बँकेची भरती पारदर्शी होण्याकामी 'वर्कवेल' या कंपनीस सहकार खात्याने काम दिलेले आहे. वास्तविक पाहता या कंपनी व्यतिरिक्त इतर अनेक कंपन्या नावाजलेलया आहेत. परंतू जिल्हा बँकेमधील ७०० पदांच्या भरतीचे काम वर्कवेल या कंपनीला दिले गेले. वापूर्वी सन २०१७ मध्ये या बँकेच्या नोकर भरतीचे काम 'नायबर' या संस्थेला दिलेले होते. त्या भरतीत गैरप्रकार घोटाळा झालेला होता.

नोकर भरतीमध्ये घोटाळा अथवा गैरप्रकार होवू नये सरा शासनाचा व सहकार खात्याचा उद्देश असतो. जिल्हा बँकेच्या ७०० पदांच्या भरतीचे काम ज्या वर्कवेल कंपनीस दिले ती कंपनी कशी आहे हे बघुनच या कंपनीला भरतीचे काम देणे क्रमप्राप्त होते. मुळातच ही वर्कवेल कंपनीची नोंदणी अवघ्या दोन वर्षापूर्वी झालेली आहे. या कंपनीस ७६ पदांच्या भरतीचा अल्प अनुभव तसेच अवघे दोन खोल्याचे बाणेरला कार्यालय असलेली ही कंपनी भरती प्रक्रिया व्यवस्थित राबविल की नाही याबाबत गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. आपण दोघेही कार्यक्रम मंत्री म्हणून काम पाहात आहात. आपण या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालावे. अन्यथा, एका नावाजलेल्या बँकेचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. या प्रकरणात आपण स्वतः जातीने लक्ष घालून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संपूर्ण संचालक मंडळाची चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करावी वेळ पडल्यास जिल्हा बँकेचे संपूर्ण संचालक मंडळच बरखास्त करावे अशी समासदांच्यावतीने मागणी करत असल्याचे अॅड. लगड यांनी म्हटलेले आहे.

गृहिणी

आरोग्य

तुळशीचा असाही उपयोग

फ्रीजमधील शिळे उरलेले अन्न, सावलेलेले वा प्रक्रिया केलेले अन्न खाऊ नये. त्या अन्नात कुठलाही पोषक पदार्थ उरलेला नसतो. असे अन्न शरीर स्वास्थ्य बिघडवतात. अन्न हे ताजे, गरम, कमी शिजवलेले, कच्चे या स्वरूपात खावे. गरजेपुरतेच अन्न शिजवावे म्हणजे उरण्याचा प्रश्नच येत नाही. मग पित्ताचा त्रास होतो व शरीर कुरकुर करू लागते.

पाककला

बदामाची बर्फी

साहित्य : दोन वाट्या बदाम बी, दीड वाटी साखर, तूप, दहा-बारा वेलदोडे, मावा (हवा असल्यास)

कृती : बदाम भिजत घालून, सोलून पाटाखाव वाटावेत. नंतर वाटलेला गोळा तुपावर भाजावा.

साखरेचा दोन तारी पाक करून, त्यात बदामाचा वाटलेला गोळा व खवा घालून शिजवावे व चांगली गोळी झाल्यावर खाली उतरवून चांगले घोटावे. वेलदोड्याची पूड घालावी व पोळपाटाला तुपाचा हात लावून, गोळा लाटून, वड्या कापाव्यात.

सल्ला

बटाटा कसा मॅश करावा

शजविलेला बटाटा पाट्यावर वाटल्यास गोळा चिकट होतो. गोळा चिकट व्हावयास नको असल्यास बटाटा उकडून झाल्यावर गरम असतानाच, बटाटा मॅश करावयाचे यंत्र मिळते, त्यातून दाबून काढल्यास अगर शेंगदाण्याची पूड करावयाच्या यंत्रातून काढल्यास शेवेसारखा भुगा पडतो. बटाट्याचा कीस करण्यासाठी बटाटे आदल्या दिवशी रात्री उकडावेत.

वास्तू

* देवघरात अथवा सोबत मृत व्यक्तींचे फोटो अथवा प्रतिकात्मक प्रतिमा मुळीच ठेवू नयेत. देव आणि मनुष्य प्राण्यामध्ये जमीन-आसमानचा फरक आहे. तसेच मृत व्यक्तीच्या प्रतिमेची पूजा करू नये.

सौंदर्य

वॅक्सिंगनंतर बगल धुऊन क्रीम लावावे. म्हणजे त्वचा काळी पडणार नाही. हातांचा रंग उजळण्यासाठी कोरफडीचा गर लावावा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शनिवार, दि. २१ सप्टेंबर २०२४

संकष्ट चतुर्थी. शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर. भाद्रपद कृष्णपक्ष. भरणी २४।३६. सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.

राशिभविष्य

मेष : आपल्या कार्यक्षेत्रातील किंवा आपल्या व्यापारातील इतर लोकांशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगा.

वृषभ : अधिक श्रम करावे लागतील. पळापळ देखील अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. वातावरण अनुकूल राहील.

मिथुन : एखाद्या मित्राशी झालेली भेट दिलासा देईल. आर्थिक पक्षाबाबत सावध राहा. व्यवसायातील अनेक कामे मार्गी लागतील.

कर्क : कौटुंबिक पाठिंबा देखील मिळणार नाही. वाहने अधिक काळजीपूर्वक चालवाल. जिद्दीने व चिकाटीने कार्यरत रहाल.

सिंह : आपणास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल. मानसन्मानात वाढ होईल.

कन्या : आज आपणास कठोर श्रम करावे लागेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. वैवाहिक सौख्य लाभेल.

तूळ : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. मानसिक स्थिती आल्हाददायक राहील.

वृश्चिक : आरोग्याची काळजी घ्याल. व्यस्त राहाल. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. दिवस आनंदात जाईल.

धनु : मानसन्मानाचे योग येतील. व्यापार-व्यवसायात अडचणी येण्याची शक्यता.

मकर : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. मानसिक स्थिती आनंददायक राहील.

कुंभ : संभाषणात सावधगिरी बाळगावी लागेल. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा.

मीन : खर्च अधिक होईल. मनोबल व आत्मविश्वास वाढवणारी एखादी घटना घडेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

रोजगार

वेडा :- बेकारीचा प्रश्न मी चुटकीसरशी सोडवू शकेन. सर्व स्त्रियांना एका बेटावर ठेवायचं आणि पुरुषांना दुसऱ्या बेटावर.

डॉक्टर :-
पण त्यामुळे बेकारी कशी नष्ट होणार ?

वेडा :- सगळेजण नौका बांधण्याचा उद्योगात मग्न होतील ना!

...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* पहिला बाजीराव या साली सत्तेवर आला - १७२० * पानीपतचे दुसरे युद्ध या साली झाले - १५५६
* पद्मावती पुस्तकाचे लेखक हे आहेत - सुताप्पा बसु * सर्वात हलका वायू हा आहे - हायड्रोजन

संदर्भ - 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक
मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ७०१४ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) चिंचेतील बी ३) प्रमाण; गमक; पुरावा; प्रमाणपत्र ५) मल्ल; कुस्तीगीर ७) झाडावर पिकलेले फळ ८) आकाश; अंबर; गगन ११) चांदीसोन्याची काठी घेऊन राजाच्या पुढे चालणारा; वेत्रधारी १३) इंधन म्हणून वापरली जाणारी लाकडे वगैरे १६) प्रतिपदा; वर्षप्रतिपदा १७) नवरा; पती; स्वामी १९) एक प्रसिद्ध उद्योगपती २०) डोळा; चक्षू; अक्ष; नेत्र २२) एक पालेभाजी

उभे शब्द :- १) जुने फाटके वस्त्र; चिरगूट; लकतर २) कपडालत्ता; वस्त्रप्रावरण ३) फिर्याद; हक्क; शत्रुत्व; दुष्मनी ४) खोदणे; खणणे ६) पदार्थाचा भिजविलेला व मळलेला गोळा ९) प्रचंड टोलेजंग १०) आहे असे वाटणे पण प्रत्यक्षात नसणे अशी स्थिती १२) एक चर्मवाद्य; मृदंग; पखवाज १४) रट्टा; तडाखा; प्रहार १५) सावकाश; हळू; धिमा; संथ १७) सद्गर्तन; उदारता, शील १८) सौंदर्य; रूप १९) भजनातील एक वाद्य २१) एक धान्य; जव; सातू

शब्दगंध क्र. ७०१३ चे उत्तर

फिल्मीचक्कर क्र. ९१५५ चे उत्तर

* * * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : एक ध्येय तुमचे आयुष्य बदलू शाकते.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

माणूस किती दिवस उपाशी राहू शकतो?

सजीवांना जिवंत राहण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते. त्या म्हणजे हवा, पाणी व अन्न. (याला काही विषाणू व अतिसूक्ष्म सजीव अपवाद ठरतात.) काही अपवाद सोडले तर कुठलाही सजीव या तिन्हीही गोष्टीशिवाय जिवंत राहू शकत नाही. आपल्याकडे काही माणसे निर्जळी उपास करतात, पण अशा व्यक्ती फारच थोडाच. आपण नेहमीपेक्षा उशिरा जेवलो किंवा कमी खाल्ले तरी आपल्याला भुकेचा त्रास होतो. याचे कारण अन्न हे आपले इंधन आहे आणि कुठलीही यंत्रणा विनाइंधनाची कार्यरत राहू शकत नाही.

आपल्या दिवसभराच्या कामात आपले शरीर ज्या हालचाली करते, त्यासाठी लागणारी ऊर्जा अन्नामुळे मिळते. अगदी वनस्पतींनासुद्धा अन्न आवश्यक असते. अतिशीत तापमानाच्या प्रदेशात काही प्राणी उन्हाळ्यात शरीरात अन्नाचा साठा करून घेतात व हिवाळ्यात शीत निद्रा घेतात. त्या वेळेस त्यांच्या शरीरात चरबीच्या स्वरूपाचा साठलेला अन्नसाठा त्यांना ऊर्जा पुरवतो. अर्थात या काळात हे प्राणी झोपलेले असतात. त्यांचा श्वास मंद होतो. रक्तामिसरण जवळजवळ थांबते. त्यामुळे त्यांना ऊर्जाही कमी लागते.

माणसाच्या शरीरात अशी कुठलीही सोय नाही. यामुळे उपोषणास बसणारी माणसे १०-१५ दिवसांत हॉस्पिटलमध्ये हलवली जातात व त्यांना द्रवस्वरूपातील अन्न दिले जाते. मध्यंतरी आयर्लंडम थले काही जण आपल्या राजकीय मागण्यांसाठी उपोषणास बसले होते. यातल्या बॉबीसँड्स व त्याच्या अन्य सहकाऱ्यांचा या उपोषणातच देहांत झाला. माणूस किती दिवस अजिबात अन्न न घेता जगू शकेल हे ज्या त्या माणसाच्या शरीररचनेवर अवलंबून आहे. मात्र २३ ते २५ दिवसांनंतर मानवी शरीरावर याचे कायम स्वरूपाचे दुष्परिणाम होतात.

द्रव पदार्थ, सोडा वॉटर, लिंबू पाणी आदी पदार्थ सेवन करून काही व्यक्ती वर्षभर जगल्याची उदाहरणे आहेत. मध्यंतरी एक बाई केवळ चहा पिऊन तीन वर्षे जगल्याची बातमी होती. अशा तऱ्हेने जगल्याचे अधिकृत उदाहरण 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस' मध्ये दिले आहे. ते आहे ३८२ दिवसांचे, अँगल वॉरविएल या व्यक्तीचे. पण या काळात तो चहा, कॉफी, पाणी व सोडा वॉटर घेत होता. हा उद्धांक त्याने १९६५ मध्ये केला.

अनुकरण

एक माणूस एकदा आपल्या नादात रस्त्याने चालला होता. तेवढ्यात त्याच्या मनात एक अजब लहर आली. तो रस्त्याच्या चौकात उभा राहिला आणि डोळ्यांसमोर आडवा हात लावून आकाशाकडे पाहू लागला. थोडावेळ पाहिल्यानंतर 'अरे वा! अरे वा!!' असे उद्गार काढून हसू लागला. रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचे त्याच्याकडे लक्ष गेले. त्यांनीही त्या माणसासारखेच आकाशात बघायला सुरुवात केली. थोड्या वेळातच आकाशाकडे बघणाऱ्यांची गर्दी वाढली. पण आपण नेमके आकाशात काय पाहतो आहोत हे कुणालाच माहीत नव्हते. मात्र सारेच एकमेकांचे अनुकरण करत होते. त्याच गर्दीतून वाटचाल करीत ५ ते ६ अंध लोक जात होते. त्यांना रस्ता पार करायचा होता.

'ओ, आम्हाला रस्ता पार करून द्या. कुणी आम्हाला मदत करा,' असे ते कळकळून सांगत होते. परंतु त्यांच्या या बोलण्याचे कुणाकडेच लक्ष नव्हते. जो तो आकाशाकडे पाहण्यात मग्न होता.

तेवढ्यात गर्दीतून एक युवक पुढे आला, त्याने त्या अंधांना आधार देत रस्ता पार करायला मदत केली. इतर लोक मात्र त्यांची गंमत बघत होते. परंतु कुणीही मदतीला पुढे यायला तयार नव्हता. जगरहाटी ही अशीच असते. एखाद्या गोष्टीचे अनुकरण करावयाचे असल्यास त्यासाठी अनेक लोक पुढे येतात. परंतु एखादे चांगले काम करायला मात्र कुणी सहसा पुढे येत नाही.

तात्पर्य : चांगल्या गोष्टीपेक्षा वाईट गोष्टींकडे माणूस चटकन आकर्षित होत असतो.

जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

आम्ही जर विश्लेषण केले की आम्ही आपल्या शरीरासाठी किती वेळ लावला व आपल्या आत्म्यासाठी किती वेळ लावला. तर होऊ शकते की दोघांमध्ये खुप अंतर मिळेल.

जर आम्ही आपल्या जीवनातील उरलेल्या वर्षांचा सर्वोत्तम सदुपयोग करू इच्छितो तर आम्ही आपल्या आत्म्याकडे अधिक लक्ष द्यावयास पाहिजे. आम्ही आपल्या आत्म्याला परलोकाकरीता तयार करण्याचा अर्थ असा आहे की, आम्ही ध्यानाभ्यास आणि निष्काम सेवेत वेळ दिला पाहिजे. याचा अर्थ असा की आम्ही एक खरा मनुष्य बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि जेव्हा शक्य होईल तेव्हा आम्ही इतरांची मदत केली पाहिजे. याचा अर्थ असा की आम्ही आपल्या जिवनाच्या विश्लेषणास व त्यात सुधारणा करण्यात वेळ द्यावा याचा अर्थ असा की आम्ही प्रभुच्या स्मृतीत वेळ द्यावा. परलोकात या गोष्टीचे महत्त्व आहे की आम्ही एक स्नेही व्यक्ती आहोत का?

आम्ही आपल्या दैनिक जीवनातील प्राथमिकता निश्चित कराव्या. आम्ही आपल्या भौतिक शरीराकडे अधिक लक्ष दिल्या कारणाने आपल्या आत्म्याची उपेक्षा व्हायला नको. आम्ही आपल्या जीवनात काही संतुलन ठेवले पाहिजे. नक्कीच आम्ही आपल्या शरीर व परिवाराचा विचार केला पाहिजे परंतु त्याच बरोबर हे निश्चित केले पाहिजे की आम्ही आत्म्यासाठी पुरेसा वेळ देऊ. जेव्हा अंतीम वेळ येईल, आमचे शरीर मातीत मिसळून जाईल परंतु आमचा आत्मा जिवंत राहील. आम्ही वेळ काढला पाहिजे. जेणेकरून आमचा आत्मा येथे ही आणि परलोकातही शक्तीशाली राहील. असे सांगितले जाते की, परमेश्वराला 'माणूस' निर्माण करण्याची इच्छा झाली, तेव्हा प्रभुने सर्व देवदूतांना बोलवले आणि त्यांचा सल्ला घेतला. प्रभु आपल्या सिंहासनावर बसले आणि त्यांच्या चारही बाजूला त्यांचे देवदूत उभे राहिले, एकेकाला प्रभुने त्यांचा सल्ला विचारला 'न्यायाच्या' देवदूताने सांगितले की, ''मनुष्य निर्माण करू नका, आणि जर त्याची निर्मिती कराल तर ते आपसात-एकमेकांमध्ये अनेक प्रकारची पापे करतील, ते दुष्ट पापी, स्वार्थी तसेच हिंसक होतील आणि अनुचित असे कार्य करतील.

सत्याचा देवदूत पुढे म्हणाला, मनुष्याला (मानवाला) निर्माण करू नका. ते एकमेकांशी खोटे बोलतील धोका देतील आणि चोऱ्या करतील हे प्रभो, पुढे ते आपल्याशी सुध्दा खोटे बोलतील आणि आपल्यालाही धोका देतील.''

पुढे पावित्र्याच्या देवदूताने म्हटले मानवाला निर्माण करू नका, हे प्रभो ते अनेक प्रकारचे अपवित्र कार्य करतील आणि आपल्या नावाची बदनामी करतील.

शेवटी प्रभु 'दया' च्या देवदूताकडे वळले व त्याला विचारले 'यावर तुमचा काय विचार आहे. ?'

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

उनके बडे भाई, जब तक ये खाना नहीं खाते थे, तब तक खाना नहीं खाते थे। दूध में मलाई डालकर ले आते थे, सामने बैठाकर इनको पिलाते थे। जब तक भाई साहब नहीं पीते थे, तब तक वे छोडते नहीं थे। जब वे सेन्टर पर आये, बहनों की बहुत ही सेवा की। जब सर्दी के दिन आते थे तब भाई साहब छत पर ३-४ खटिया लगवाते थे और सब बहनों को वहाँ बुलाकर सन्तरे और शहद खिलाते थे। उनको जो चीज़ खाने में अच्छी लगती थी, वही सबको खिलाते थे। जब रशियावाले शक्ति नगर आने लगे तो भाई साहब कहते थे कि, ''उनको पकौड़े और हलवा खिलाओ।'' मैं कहती थी, ''भाई साहब, वे विदेशी हैं, ये कैसे खायेंगे?'' कहते थे, ''नहीं, यह तो भारत का व्यंजन है, यह उन्हें ज़रूर खिलाओ।'' उनसे मिलने कोई भी आता था तो उसको ज़रूर कोई-न-कोई सौग़ात देकर भेजते थे। मैं कहती थी, भाईसाहब, वे तो आपसे दो मिनट मिलने आये हैं, ओम शान्ति करने आये हैं, उनको भी सौग़ात देनी है क्या?'' कहते थे, ''देखो, वे बाबा के घर पर आये हैं, उनको ख़ाली हाथ नहीं भेजना चाहिए।'' इतना ही नहीं, उन्होंने ऊपर छत पर एक किचन बनवायी थी। मैंने पूछा, ''भाई साहब, खाना तो नीचे बनता है, आपने क्यों ऊपर एक छोटी किचन बनवायी है?'' कहा, ''देखो, बहनें मुझे रोज़ खाना बनाकर खिलाती हैं, कभी-कभी मैं भी कुछ बनाकर बहनों को खिलाऊँ इसलिए बनवायी है।'' उनके पास एक भाई था सेवा में, उसके साथ मिलकर कुछ न कुछ सब्जी या कोई विशेष चीज़ बनाकर बहनों को खिलाते थे। वे खुद हमें परोसते थे।

कमरे में चटाई बिछाते थे और हरेक के लिए एक-एक चौकी रखकर, हमें चटाई पर बिठाकर खाना खिलाते थे। कभी-कभी क्लास में आनेवाले छोटे बच्चों को बुलाकर खिलाते थे। कहते थे, यही कल बड़े होकर बाबा की सेवा करेंगे। उन बच्चों को अपने हाथों से खिलाते थे। उनके सामने बैठकर प्यार से उनको कहते थे और खाओ, और खाओ। इस प्रकार बच्चों से भी उनका बहुत प्यार था। उनको खिलाकर भाई साहब बहुत ख़ुश होते थे।

क्लास में आनेवाले भाई-बहनों से भी उनका अथाह प्यार था। मान लो मधुबन से टोली आयी पाँच की। भाई साहब कहते थे, चक्रधारी बहन, ''देखो बाबा के घर से टोली आयी है, क्लासवालों को खिला दो।'' मैं कहती थी, ''भाई साहब, ११० की क्लास है, इन पाँच तोशों को कैसे खिलाऊँ?'' कहते थे, ''अगर आप छुट्टी दो तो मैं अपने हाथों से खिला दूँ।''

मैं कहती थी, ''ठीक है भाई साहब, मुझे क्या ऐतराज़, खिलानेवाले आप हो, खिला लीजिये ५ पीस, १५० लोगों को।'' कहते थे,

''होमियोपैथी की गोली बीमार को ठीक कर देती है तो भगवान के घर से आयी हुई टोली को मैं छोटी-छोटी गोली बनाकर खिलाऊँगा तो इनको कितना फ़ायदा होगा!'' भाई साहब के प्रति भाई-बहनों की इतनी श्रद्धा होती थी कि लाइन लगाकर उनके सामने खड़े हो जाते थे। कभी उन्होंने अपना जन्मदिन नहीं मनाया भाईसाहब ने कभी अपना जन्मदिन नहीं मनाया। कभी बहनें सितम्बर की १० तारीख़ को याद दिलाती थीं कि भाई साहब, आज आपका जन्मदिन है, तो कहते थे, छोड़ दो, जब मरजीवा जन्म हुआ, उसी समय मेरा जन्मदिन भी हो गया। आप बताओ, मेरा वो जन्म, मेरा नया जन्म कब हुआ, किस समय हुआ ? हम सोच में पड़ जाते थे क्योंकि उन्होंने कभी बताया ही नहीं था कि कब और किस समय उनका अलौकिक जन्म हुआ।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

मालतीकाकू बऱ्याच दिवसांपासून माझ्या पेशंट आहेत. एकदा असेच त्या दवाखान्यात माझ्याकडे तपासणीसाठी आल्या व गंभीर चेहरा करून म्हणाल्या, ''अहो! मंडम नेहमीचाच त्रास होतोय! त्या त्रासापासून माझुं सुटका नाही. मालती काकूंना नाना वारंवार योनीमार्गी जंतुसंसर्ग होऊन खाज व सूज येत असे. मी त्यांना कायम रक्त-लघवी तपासून घेऊ म्हणत असे; परंतु औषधे घेतल्यानंतर लगेच बरे वाटते, म्हणून त्या तपासणी करण्याचे टाळत असत. वारंवार होणारा जंतुसंसर्ग पाहून मी त्यांना म्हणले, ''आज मी प्रथम तुमची रक्त-लघवी तपासणार आणि त्यानंतरच औषधोपचार करणार.'' तपासणी केल्यानंतर मालतीकाकूच्या रक्तामध्ये व लघवीमध्ये साखरेचे प्रमाण जास्त आढळले. मालतीकाकूंना रिपोर्ट बघून धक्का बसला. त्या मला म्हणाल्या, ''मॅडम, मी फक्त चहाच पिते. इतर काहीही गोड खात नाही. मग मला मधुमेह कशामुळे झाला?'' हे ऐकून मी म्हणाले, ''आता चहासुद्धा नको; कारण त्यामुळे तुमची साखर अजून वाढणार. मी तुम्हाला मधुमेह म्हणजे काय व त्यामध्ये योग्य जीवनशैली व आहार कसा असावा हे समजावून सांगते.''

मधुमेहाची व्याख्या :

आपण घेतलेल्या आहाराचे पचनानंतर साखरेत रूपांतर होते. शरीरातील असंख्य पेशी, स्नायू, शरीराच्या कामासाठी साखरेचा वापर करतात. इन्सुलिनच्या अकार्यक्षमतेमुळे ही साखर शरीरातील पेशी वापरू शकत नाहीत. न वापरलेली साखर शरीरात तशीच पडून राहते. यालाच मधुमेह म्हणतात.

मधुमेहाचे प्रकार : मधुमेहाचे दोन प्रकार आहेत : १) स्वादुपिंडात (Pancreas) इन्सुलिन निर्माण होत नाही.

२) शरीरात इन्सुलिन कमी प्रमाणात तयार होते. (Insulin Resistance) त्यामुळे साखर वाढते.

मधुमेहाची कारणे :

अनुवंशिकता हे मधुमेहाचे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे. लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव, चुकीचा आहारविहार, कष्टाच्या कामांची कमतरता, व्हायरस इन्फेक्शन आणि मानसिक ताण इत्यादी मधुमेह होण्याला कारणीभूत असतात.

मधुमेहाची लक्षणे :

१) रुग्ण लठ्ठ दिसतात. मात्र अशक्तपणा जाणवतो. २)

वारंवार तहान लागते.

३) रात्री झोपेतून लघवीसाठी दोन-तीन वेळेस उठावे लागते.

४) तोंडाला दुर्गंधी येते.

५) जखमा लवकर बऱ्या होत नाहीत.

६) हातापायांची आग होते.

७) जननेंद्रियास वारंवार जंतुसंसर्ग होतो.

- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

दलित आदिवासी समाजाच्या प्रश्नावर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, ठिय्या आंदोलन करुन निदर्शने

नगर – दलित आदिवासी समाजाने अतिक्रमित केलेल्या सरकारी जमिनी व राहते घरे त्यांच्या नावावर करावे, भूमीहीन आदिवासी बांधवांना सरकारी जमीनीचे वाटप करावे व दलित, आदिवासी समाजावर होत असलेला अन्याय अत्याचार रोखण्यासाठी कठोर पाऊल उचलण्याच्या मागणीसाठी बहुजन समाज पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात दलित, आदिवासी समाजबांधव व महिला सहभागी झाल्या होत्या.

बहुजन समाज पार्टी श्रीगोंदा विधानसभेच्या पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली महापालिका येथून मोर्चाला प्रारंभ करण्यात आला. हक्काची जागा, कसण्यासाठी शेतजमीन व घरे मिळण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करुन दलित आदिवासी समाजातील पुरुष व महिला मोर्चात सहभागी झाल्या होत्या. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर आला असता प्रवेशद्वारा समोर निदर्शने, ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी सुनिल ओहोळ, श्रीगोंदा विधानसभा अध्यक्ष विठ्ठल म्हस्के, उपाध्यक्ष कानिफनाथ बर्डे, जिल्हा उपाध्यक्ष शाहनवाज शेख, जिल्हाध्यक्ष उमाशंकर यादव, जिल्हा महासचिव राजू शिंदे, विधानसभा प्रभारी गणेश बागल, शहराध्यक्ष फिरोज शेख पत्रेवाला, बाळासाहेब काते, संजय संसारे, मोहन काळे, छबू मोरे, रोहित साळवे, रतन पवार, त्रिंबक साळवे, हौसराव गोरे, बिलास माळी, अर्जून उल्हारे, अजित भोसले, छबू चव्हाण, संतोष भोसले, गोरक्षनाथ पवार, कैलास कोळगे, साहेबराव मनतोडे, सनी पवार, महादेव गायकवाड, विजू बर्डे, संजय जगताप, अमजत शेख आदी सहभागी झाले होते.

विविध मागण्यांसाठी बहुजन समाज पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात आले.

दलित, आदिवासी समाज हा देशातील मूळ रहिवासी असलेला समाज असून, या समाजातील उपेक्षित कुटुंबे आजही भूमिहीन आहेत. भूमिहीन कुटुंबांना जमीन मोफत वाटप करण्यात यावे. ज्या कुटुंबांनी सरकारी जागेवरती अतिक्रमण करुन उपजीविका करत आहे; अशा कुटुंबांच्या नावावर त्या जमीनी करण्यात याव्यात त्यांच्या नावाचे खाते उतारे बनवावे. राहते घर त्यांच्या नावावर करुन, ज्या सरकारी जागेत राहतात तेथेच त्यांच्या नावावरती घरकुले करुन देण्याचे बसपाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

सरकारी जागेत अतिक्रमण केलेल्या दलित, आदिवासी समाजाला जमीन विहित करण्यासाठी प्रशासनातील अधिकारी त्रास देत असून, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. दलित, आदिवासी समाजातील तरुणांवर अनेक खोटे गुन्हे दाखल असून, त्यांना पोलीस प्रशासनाकडून खोटया व पेठिंग गुन्हात अडकवण्याच्या घटना घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्वातंत्र्यानंतर आजही या उपेक्षित घटकांना स्वातंत्र्याची फळे मिळालेली नाहीत. शासनाच्या कल्याणकारी व विविध शासकीय योजना या समाजापर्यंत पोहोचू शकले नाही. सरकारी निधी या समाजाबद्दल वाईट असल्याने हा समाज उपेक्षित राहिला आहे. दलित आदिवासी समाजातील ७५ टक्के कुटुंबे ही मोल–मजूरी करणारी आहे. त्यांच्याकडे कुडलेही उपजीविकेचे साधन नाही. अशा दलित आदिवासी व भटके विमुक्त समाजाला उपजीविकेसाठी सरकारने शासकीय जमिनीचे वाटप करण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्यावतीने करण्यात आली आहे.

दलित, आदिवासी समाज आजही उपेक्षितपणाचे जीवन जगत आहे. शासकीय योजना फक्त कागदोपत्री रंगवल्या जात असून, हा समाज आजही न्यायापासून वंचित आहे. गुन्हेगारीचा शिक्का मारुन या समाजावर एकप्रकारे अन्याय सुरु आहे. या समाजाला राहण्यासाठी घरे नाही, कसण्यासाठी जमीन नाही. ज्या सरकारी ते राहत आहे, त्या जागा खाली करण्यासाठी देखील सुपाऱ्या घेऊन त्यांच्यावर अन्याय सुरु आहे. अनेक वर्षापासून त्यांच्या ताब्यात असलेल्या सरकारी जमिनी व राहते घरे त्यांच्या नावावर करण्याची गरज आहे, असे सुनील ओहोळ म्हणाले.

दलित, आदिवासी समाजाला न्याय देण्यासाठी बसपा त्यांच्या पाठिशी उभी आहे. या समाजाचा फक्त राजकारणासाठी वापर करण्यात आला. त्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही. किमान त्यांच्या मुलांचे भविष्य उज्वल होण्यासाठी व त्यांचे भटकंतीचे जीवन थांबविण्यासाठी शासनाने त्यांच्या नावावर जागा करुन त्यांच्या जीवनात स्वैर्य निर्माण करावे असे उमाशंकर यादव म्हणाले.

सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या ६ खेळाडूंची 'राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धे'साठी निवड

महाराष्ट्राच्या संघाचे करणार प्रतिनिधित्व

नगर – टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने नाशिक येथे २६ ते २९ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राहुरी कृषी विद्यापीठ येथील सहा महिला खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. हे सहा खेळाडू महाराष्ट्राच्या संघात खेळणार असून, त्यांनी राज्य स्पर्धेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर निवड झाली आहे.

स्वामिनी जेजुरकर अक्षदा बेल्हेकर सिमरन शेख

ऐश्वर्या चौरसिया मृणाल ननवरे वृषाली पारधी

राष्ट्रीय टेनिस क्रिकेट संघाची निवड टी.सी.ए. क्रिकेट क्लबचे श्रीकांत तिरमल यांचेही त्यांना मार्गदर्शन असते.

टेनिस क्रिकेट हा खेळ शालेय क्रीडा महासंघ, व क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे मान्यता प्राप्त खेळ असून, शालेय स्तरावर १४, १७, १९ वर्ष वयोगट मुले, मुली या वयोगटात हा खेळला जातो.

राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्यामुळे यशस्वी विद्यार्थिनींचे राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील, शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. महानंद माने, अधिष्ठाता रसाळ, खजिनदार महेश घाडगे, विद्यार्थी कल्याणचे प्रमुख डॉ. महावीर लिंग चौहान, विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी विलास आवारी, विद्यालयाचे प्राचार्य अरुण तुपविहिर, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा आदींसह विद्यालयातील सर्व शिक्षकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

नेप्तीत ईद–ए–मिलाद निमित्त हिंदू – मुस्लिम ऐक्याचे दर्शन

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथे इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत प्रेषित मोहम्मद पैगंबर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावात जुलूस मिरवणूक काढण्यात आली होती

गावात शांतता नांदावी यासाठी पोलीस प्रशासनाच्या आवाहनानंतर मुस्लिम बांधवांनी गणपती उत्सव नंतर मुरुवारी गावातून अशी जुलूस मिरवणूक काढली. या मिरवणूकीमध्ये मुस्लिम बांधवा बरोबर हिंदू बांधव ही मोठया प्रमाणात सहभागी झाले होते. यावेळी हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडत होते.

गावात चौका चौकात या मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. यावेळी हिंदू मुस्लिम ऐक्याचा नारा देण्यात आला. सरपंच संजय जपकर यांनी जुलूस मिरवणुकीचे स्वागत करुन मुस्लिम बांधवांना ईद–ए–मिलादच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी उपसरपंच फारुख सय्यद, माजी उपसरपंच संजय जपकर, समता परिषदेत तालुकाध्यक्ष रामदास फुले, उपसरपंच दादू चौगुले, जालिंदर शिंदे, प्रा. एकनाथ होले, मुनीर सय्यद, बाबुलाल सय्यद, वाजीद सय्यद, आफताब सय्यद, परवेज सय्यद, नावेद सय्यद, इमरान सय्यद, जमीर सय्यद, रफिक सय्यद, राहुल गवारे, महेंद्र चौगुले, उमर सय्यद, जावेद सय्यद, नौशाद शेख, सलीम सय्यद, इजाज सय्यद, जमीर सय्यद, समीर सय्यद, बादशाह सय्यद, नितीन कदम, बंडू जपकर, आसिफ सय्यद, संतोष चहाळ, भूषण पवार, हुसेन सय्यद, मुक्तार सय्यद, युनूस सय्यद, कयूम सय्यद, मोईन सय्यद, पोलीस पाटील अरुण होले, रवींद्र होळकर, बिलास जपकर, बबन सय्यद, सिकंदर शेख, नाले हैदर यंग पार्टीचे कार्यकर्ते व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त नेप्ती (ता. नगर) येथे जुलूस मिरवणूक व भंडारा वाटप प्रसंगी सरपंच संजय जपकर, माजी उपसरपंच संजय जपकर, माजी उपसरपंच फारुख सय्यद, रामदास फुले आदी.

यावेळी मुस्लिम बांधवांच्या वतीने भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील नागरिकांनी भंडाऱ्याचा लाभ घेतला. नाले हैदर यंग पार्टीच्या वतीने चौकात सजावट करण्यात आली होती तसेच चौका चौकात झेंडे चौकात झेंडे लावण्यात आले होते.

सर्व धर्मात प्रेम शांतता व माणूसकीचा संदेश देण्यात आलेला आहे. विविधतेमध्ये असलेली एकता हे भारत देशाचे वैभव आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्व जाती धर्मांतील स्वातंत्र्य वीरनी योगदान दिले आहे. संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी ईश्वराने पैगंबर यांना भुतलावर पाठवले होते व त्यांनी जीवन कसे जगावे हे जगाला दाखवून दिले. मुस्लिम धर्माचे धर्मगुरु नबी रसूल हजरत महंमद पैगंबर यांनी संपूर्ण जगाला शांतीचा आणि एकतेचा संदेश दिला आहे. असे प्रतिपादन समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रामदास फुले यांनी केले आहे.

अहमदनगर जिल्हा प्रधान व सत्र न्यायाधीश सुधाकर यालगिरू शांची अमरावती येथे बदली झाल्याबद्दल त्यांचा सन्मान कलानां मोहटा देवस्थानचे विश्वस्त नोटरी पब्लिक ॲड. विक्रम वाडेकर, पराग म्हंकाळे.

मोहम्मद पैगंबर जयंती निमित्त मतिमंद मुलांना खाऊ, किराणा व जीवनोपयोगी वस्तू वाटप

मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त तपोवन रोडवरील मतिमंद मुलांच्या शाळेत खाऊचे वाटप करून किराणा वस्तूचे वाटपही करण्यात आले. व बुकाचेचाच्या विशेष उपक्रम राबवण्यात आला. यावेळी सय्यद शकी बाबा, माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इस्हाक, शेख रमीर केके, फरोवा पटेल, फारुक शेख, सरफराज खान, फारूक भाई शेख, अफसर शेख, जाकीर शेख, अरबाज सय्यद, साहिल सय्यद, साबील सय्यद आदीसह पदाधिकारी.

मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त यतिमखाना मधील मुलांना चटई भेट

मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहरातील यतीमखाना या संस्थेतील अनाथ मुलांना बरसण्यासाठी अकाजलगाई ॲड सर्वेल्लयावतीने चटई देण्यात आली व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी उद्योजक अकजल असीर शेख, संस्थेचे शाकीर शेख, समीर बागवान, अहेसान शेख, फरान शेख, नईम शेख, सरफराज बागवान, हाजी समीर पटेल, दिशान बागवान, अझर शेख, वसीम शेख, साबीर शेख, साहिद शेख, इरफान शेख आदी.

सावेडी जैन स्थानकात २२ सप्टेंबरला 'मातृ पितृ पूजन कार्यक्रमा'चे आयोजन

नगर – श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघांच्या वतीने (सावेडी) २२ सप्टेंबरला सकाली ८.३० ते १०.३० या वेळेत सावेडी जैन स्थानकात महाश्रमण प्रज्ञाप्रभ हर्षी प्रवर्तक रमेशमुनीजी म. सा. यांचे सुशिष्य उपप्रवर्तक सिद्धार्थमुनी सिद्धराज (आदी ठाणा), उपप्रवर्तिनी वसंतकंवरजी म.सा. यांच्या सुशिष्या डॉ. सौम्याश्रीजी म.सा., मधुर गायिका तीर्थश्रीजी म.सा., रिद्धीश्रीजी म.सा. यांच्या मंगलमय सान्निध्यात मातृ पितृ पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.





आईवडीलांप्रती आदर व्यक्त करणे प्रत्येकाचे कर्तव्य असते. समाजातील प्रत्येक परिवारात ही भावना रूजण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांनी येताना घरुन थाळी, वाटी, कुंकू, दूध, अक्षता, २ मोत्याची माळ पूजेसाठी आणायची आहे. कार्यक्रमानंतर सर्वांचाही गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली आहे. गौतम प्रसादीचे लाभार्थी शैलेश विरेश एसिकलाल कोठारी परिवार आहे. या कार्यक्रमाची नियोजन व्यवस्था जैन श्रावक संघ सावेडी, त्रिशला महिला मंडळ, युवक संघ, प्रियदर्शनी बहु मंडळ, महावीर परिवार, आनंद आशिष जाप मंडळ, जय आनंद मॉर्निंग ग्रुप, कन्या मंडळ करीत आहे. जास्तीत जास्त समाज बांधवांनी सहपरिवार या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

यतिमखाना मधील अनाथ मुलांची जबाबदारी यापुढे माझी राहणार

खा. निलेश लंके यांचे प्रतिपादन; टीम हंगर वॉरियर्सच्यावतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

नगर – निराधार विद्यार्थ्यांना आधार देणाऱ्या यतिमखाना संस्थेचा सभासद म्हणून जबाबदारी सांभाळणार असून, यापुढे यतिमखाना मधील अनाथ मुलांची जबाबदारी माझी राहणार असल्याची भावना खा. निलेश लंके यांनी व्यक्त केली.

मोहंमद पैगंबर जयंतीनिमित्त शहरातील यतीमखानामधील ३०० विद्यार्थ्यांना टीम हंगर वॉरियर्स या सामाजिक संघटनेच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप खा. लंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी हंगर वॉरियर्सचे ॲड.नूमेर शेख, अफफान सोलापूरे, दानिश इनामदार, सलमान सय्यद, फुझुद्दीन हकीमजीवाला, फुरकान शेख, साहिल इनामदार, मोईन शेख, माझ खान, बंटी शेख, अक्रम शेख, अदनान लांबटकर, यतिमखाना ट्रस्टचे ॲड. फारूक बिलाल, अलीम हुंडेकरी, हाजी निजाम बागवान, नूरमोहंमद पठाण, रफिक मुन्सी, अन्सार शेख आदी उपस्थित होते.

पुढे लंके म्हणाले की, संस्थेला ज्या वेळी मदत लागेल, तेव्हा आम्ही सोबत राहणार आहे. देव हा मंदिर–मशिदीमध्ये नसून, चालत्या बोलत्या अनाथ मुलांमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय बूट, वह्या, पेन आदी शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

टीम हंगर वॉरियर्सच्यावतीने मोहंमद पैगंबर जयंतीनिमित्त यतीमखानामधील विद्यार्थ्यांना शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटप करताना खा. निलेश लंके. सोबत संस्थेचे पदाधिकारी.

१००८ श्री महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिर येथे पालखी मिरवणुकीत महिलांचा सहभाग

१००८ श्री महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिर, महाजन गल्ली येथे सुरु असलेल्या पालखी मिरवणुकीत व सामूहिक क्षमावली कार्यक्रमात सहभागी महिला.

नगर – १००८ श्री महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिर, महाजन गल्ली येथे ८ सप्टेंबर पासून सुरु झालेला पर्वाधिराज पर्व दशलक्षण महापर्व हर्षोल्हासाने पार पडले. दशलक्षण पर्व समाप्तीनंतर १९ सप्टेंबर भगवान महावीर स्वामींच्या पालखी शहरातील मुख्य बाजारपेठेतून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

सलग तीन वर्ष समाजातील महिला मंडळाला पालखी उचलण्याचा व मिरवण्याचा बहूमान मिळाला. त्यानंतर सर्व श्रावक–श्राविका यांनी आपले क्षमाभाव व्यक्त करत सामूहिक क्षमावलीचा कार्यक्रम करण्यात आला. त्यानंतर सामूहिक–मंडारा समाजध्यावतीने करण्यात आला.

दरम्यान दरोरोज सकाळी ५० वाजता मंदिरमध्ये भगवंतांचा पंचामृत महा–अभिषेक, महा–शांतिधारा, महा–आरती, दशलक्षण धर्म पूजा. त्यानंतर दरोरोज महिला मंडळ यांनी विधान पूजा केली. अश्या पद्धतीने सर्व धार्मिक पूजा – अर्चना अत्यंत भक्तिमय वातावरणात करण्यात आले.

मंदिरात अभिषेक झाल्यानंतर महिला मंडळाने दशलक्षण विधान, श्री भक्तामर विधान, श्री शांतीविधान, कल्याण मंदिर विधान, विषापहार विधान, कर्म दहन विधान, श्री सप्तर्षी विधान, श्री २४ तीर्थंकर विधान, नवग्रह विधान अश्या पद्धतीने दरोरोज एक विधान पूजा केली.

उपस्थित सर्व दिगंबर सैतवाल जैन श्रावक–श्राविका यांनी मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेत मनमुराद्पणे आनंद लुटला.

श्री महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिर व दिगंबर जैन समाजाचे भारतभूषण भागवत, अनिलकुमार साखरे, श्रीकांत देशमाने, संतोष भोसे, संजय महाजन, शांतिकुमार शिरबूळ, सुनील लामदाडे, प्रमोद भाळवणकर यांनी सर्व कार्यक्रमांचे आयोजन नियोजन सर्व उत्कृष्ट पद्धतीने केल्याबद्दल सर्व समाजबांधवांनी आनंद व्यक्त केला अशी माहिती स्वप्निल साखरे यांनी दिली.

सुवर्णकार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार गुणगौरव

नगर – लाड सुवर्णकार समाजातील १० वी,१२ वी परीक्षा सन २०२३ /२४ या शैक्षणिक वर्षामध्ये ७० % टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार असल्याची माहिती लाड सुवर्णकार सेंट्रल को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी दिली.

सराफ बाजार येथील लाड सुवर्णकार सेंट्रल को – ऑप क्रेडीट सोसायटी च्या माध्यमातून सुवर्णकार समाजातील ज्यांचे पाल्य इयत्ता १० वी इयत्ता १२ वी परीक्षा सन २०२३/ २०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये ७% टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले असतील त्यांनी व इतर पदवी परीक्षा व तत्सम परीक्षा किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात विशेष उल्लेखनीय संपादन केले असतील अशा पाल्यांचा गुणपत्रिकांच्या साक्षात प्रति पासपोर्ट साईज फोटो व मोबाईल नंबर, २५ सप्टेंबरपर्यंत मानस सरोवर अपार्टमेंट, तपकीर गल्ली, रामचंद्र खुंट, अहमदनगर येथे जमा करण्यात याव्यात.

आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवाकार्य कल्पवृक्षाप्रमाणे आहे

संगीताताई भंडारी यांचे प्रतिपादन

नगर – कल्पवृक्ष ज्याप्रमाणे आपल्याला सर्व काही देतो. त्याप्रमाणे आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व रुग्णांची तपासणी करण्यात येते. आचार्य आनंदऋषीजी यांच्या आशीर्वादाने हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या सर्व रुग्णांना दिलासा मिळत आहे. तसेच आरोग्य शिबिरांचा लाभ अनेक रुग्ण घेत आहेत. या आरोग्य शिबिरात सेवा करण्याची संधी भंडारी परिवाराला दिली. हे आमचे भाग्य आहे. आधुनिक पद्धतीने उपचार पद्धती केली जात असल्यामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटलचा नावलौकिक सर्वदूर पसरला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवा कार्य कल्पवृक्षा प्रमाणे आहे, असे प्रतिपादन संगीताताई भंडारी यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत कान, नाक, घसा तपासणी शिबिराचे दिपप्रज्वलनाने उद्घाटन करताना संगीताताई भंडारी. समवेत भंडारी कुटुंबातील सदस्य तसेच तज्ञ डॉक्टर मंडळी आदी.

आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या मोफत कान, नाक, घसा तपासणी शिबिराचे उद्घाटन संगीताताई भंडारी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. याप्रसंगी सीए सत्येन भंडारी, सौ.ऐश्वर्या भंडारी, सीए मोहित भंडारी, सौ. बेलताई पितळे, पोपट लोढा, सचिन भंडारी, अमोल पटवा तसेच जैन सोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया, महेंद्र कांकरिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, डॉ.आशिष भंडारी, शिबिराचे तज्ञ डॉ. सुकेशिनी गाडेकर, डॉ.अतुल तुपे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.प्रकाश कांकरिया म्हणाले, आचार्य आनंदऋषीजींचे स्वप्न साकारण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल या आरोग्य मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रुग्णसेवा मिळावी. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आनंदऋषीजी हॉस्पिटलची वाटचाल सुरू आहे.

हृदयशस्त्रक्रिया पूर्वी मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर येथे होत होत्या. २००४ साली आनंदऋषीजी हॉस्पिटलम ध्ये बायपास सर्जरी सुरू केल्यानंतर अल्पावधीतच मारतभर हॉस्पिटलचा चांगला नावलौकिक झाला आहे. तसेच हॉस्पिटलचा सर्व स्टाफ, डॉक्टर्स, नर्सेस व कर्मचारी सेवाभावी वृत्तीने आरोग्य सेवेचे कार्य करीत आहेत. या आरोग्य शिबिरासाठी सीए अभय भंडारी व भंडारी परिवाराचे योगदान मिळाले आहे.समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळेच आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतली जात आहेत.नियोजीत वर्धमान महावीर विद्यापीठाच्या प्रकल्पा मध्येही भंडारी परिवार आमच्यासोबत आहे.

सौ.ऐश्वर्या भंडारी म्हणाल्या, जैन सोशल फेडरेशनने भंडारी परिवाराला आरोग्य सेवेची संधी दिली आहे. गेल्या अनेक वर्षापासून आनंदऋषीजी हॉस्पिटल हे रुग्णांसाठी एक पर्वणीच ठरले आहे. येथील सर्व कार्यकर्ते निस्वार्थ भावनेने कार्य करीत असल्याने रुग्णांना चांगल्या प्रकारची सेवा मिळत आहे.

डॉ. अतुल तुपे म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कान,नाक,घसा यावरील उपचार चांगल्या पद्धतीने केले जात आहे.शिबिराच्या माध्यमातून मोफत व सवलतीच्या दरात उपचार केले जातात.या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा. कान, नाक, घसा तपासणी शिबिरात ९० रुग्णांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

कान, नाक, घसा तपासणी शिबिरास प्रतिसाद

इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट व आर्मी स्कूलचे संघ विजयी

नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत शालेय खेळाडूंचे रंगतदार सामने होत आहे. १२, १४ व १६ वर्ष वयोगटातील खेळाडूंचे संघ उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अरूंना, अटीतटीचे सामने होत आहे.

अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत १९ सप्टेंबर रोजी १४ वर्ष वयोगटात झालेल्या फुटबॉल सामन्यात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट व आर्मी पब्लिक स्कूलने विजय मिळवला.

सकाळच्या सत्रात १४ वर्ष वयोगटातील मुलांचे सामने झाले. यामध्ये ऊर्जा गुरुकुल विरुध्द सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट यांच्यात सामना अटीतटीचा झाला. यामध्ये सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट संघाकडून माहिर गुंदेचा याने १ गोल करुन प्रतिस्पर्धी संघावर ०–१ ने विजय मिळवला.

तर आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द प्रियदर्शनी पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन तब्बल ७ गोल केले. या सामन्यात प्रियदर्शनी पब्लिक स्कूलच्या प्रतिस्पर्धी संघावर एकही गोल करता आला नाही. आर्मी पब्लिक स्कूल कडून विरेंद्र व तन्मय याने प्रत्येकी दोन, सार्थक, प्रतिक व संकेत याने प्रत्येकी एक गोल करुन ७–० गोलने आर्मी पब्लिक स्कूलने एकतर्फी विजय मिळवला. स्पर्धेचे पंच म्हणून सलमान शेख, प्रियंका आवारे, सोनिया दोसानी, अमिषेक सोनवणे, ऋतिक छल्लाणी यांनी काम पाहिले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी फिरोदिया शिवाजीयन्सचे सदस्य परिश्रम घेत आहे.

मुंबईचे फिल्ड असिस्टंट शौविक बिश्वास यांची अहमदनगर जिल्हा ग्रंथालयास सदिच्छा भेट

नगर – राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकाता पश्चिम विभाग मुंबईचे फिल्ड असिस्टंट शौविक बिश्वास यांनी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नगर येथे सदिच्छा भेट देऊन कामकाजाची पहाणी केली. कार्यालयीन कामकाजात बद्दल समाधान व्यक्त केले. या प्रसंगी निरीक्षक रामदास शिंदे यांनी त्यांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत केले.

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकाता पश्चिम विभाग मुंबईचे फिल्ड असिस्टंट शौविक बिश्वास यांनी जिल्हा ग्रंथालय कार्यालयास सदिच्छा भेट दिली, त्याप्रसंगी निरीक्षक रामदास शिंदे आदी.

मी प्रथमच अहमदनगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातस भेट दिली असून येथे सत्तावीस हजार पेक्षा जास्त पुस्तकांचा संग्रह आहे. हा संपूर्ण ग्रंथ संग्रह ई–ग्रंथालय आज्ञावली मध्ये नोंदवलेले आहे. आजपर्यंत १०० टक्के रेट्रो रुपांतर /डाटा एन्ट्री असलेले, सर्व ग्रंथांना बार कोर्डींग व online ग्रंथ देवघेव सुरू असलेले हे महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आहे. मोठ्या प्रमाणात पुस्तके असुनही देवाण्यासाठी जागा फारच कमी असली तरी, ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी इतक्या कमी जागेत व्यवस्था केली आहे. तसेच वाचकांना साठी ग्रंथालयात बसुन विनामूल्य वाचनासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे.

या कार्यालयासाठी लवकरच नवीन भव्य इमारतीचे बांधकाम होणार आहे, ज्यामध्ये सर्व सेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मला जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाची सर्वांगीण भरभराट होताना पहायची आहे. आणि जिल्ह्यातील जनतेसाठी सर्व उत्तम सेवा देण्यासाठी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन शौविक बिस्वास यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी शैलेश घेगडमल, संतोष कापसे, ऋषीकेश जायभाय, सुंभे सर उपस्थित होते.

'गुरुकुल' संस्कारदायी शिक्षणाची केंद्रे

आर्य समाजाचे प्रधान लाखमीभाई वेलाणी

नगर – अहिल्यानगर १८ सप्टेंबर रोजी स्वामी विरजानन्द दंडी कन्या गुरुकुल ता. कामरगाव मु. पो. पिपळकोंडा थेथे. महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे उपप्रधान व पुणे आर्य समाजाचे प्रधान लखमसीभाई वेलाणी जी आणि त्यांचा परिवार यांनी नुकतीच गुरुकुलला सदिच्छा भेट दिली.

स्वामी विरजानंद दंडी कन्या गुरुकुलचे पुणे आर्य समाजाचे प्रधान लाखमीभाई वेलाणी यांनी गुरुकुलला भेट दिली. त्यावर्षाची उपस्थित गुरुकुलचे विद्यार्थी आदी.

गुरुकुलच्या शिक्षणाचे महत्त्व सांगताना म्हणाले. आपण सर्व भाग्यवान आहात कारण आपल्या मागातील कितीतरी शाळा सोडून दूरवर येऊन वेदाचे ज्ञान प्राप्तीसाठी गुरुकुल चे शिक्षण घेत आहात. आज गुरुकुलचे शिक्षण संस्कारदायी, उत्कृष्ट मनुष्य निर्मिती, आदर्श जीवन पद्धती व धार्मिक शिक्षण देऊ शकते.

ते म्हणाले सामाजिक जीवनात लोक डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी होत आहेत. ज्यांना लाखो रुपये वेतन आहे. पण आपल्या परिवारात वेळ व चांगले संस्कार देण्यास कमी पडत आहेत. आपण जे काम, कार्य करतो ते धर्मानुसारच असावे. वेदांमध्ये विज्ञान आहे. आपण जर संशोधन केले तर विमानाचा शोध हा विश्वुति जी आर्या यांनी केले व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्तिकी, वेदश्री, तनिष्का, तन्वी, भक्ती यांनी परिश्रम घेतले.

वेदांतूनच लागला आहे.

वेदांमध्ये सर्व प्रकारचे ज्ञान आहे मधुर व सत्य बोलण्याने पुण्य तर कटू व खोटे बोलल्यामुळे पाप मिळते. ईश्वर दयाळू पण आहे व न्यायकारी पण कारण आपल्या चांगल्या कर्माचे फळ ईश्वर मनुष्य जन्मानंच देतो. हे कुंडेवरी ते जाणतात त्यामुळे आपल्या आई वडिलांनी आपणास गुरुकुल मध्ये शिक्षणासाठी पाठवले व आपण प्रामाणिकपणे शिक्षण घेत आहात त्या सर्वांचे मी आभार मानतो.

आर्ष गुरुकुलचे ज्ञान घेऊन आपण तपस्वी बना त्यांना जीवनात अशाप्रकारे धारण करा की त्यातूनच परिवार, समाज, व राष्ट्र आपला आदर्श घेतील. तोच राष्ट्रासाठी व समाजासाठी प्रसाद असेल. असा संदेश देऊन त्यांनी आपला प्रवचनाचा समारोप केला.

कार्यक्रमाचा शेवट ऋतज्ञा व प्रमिति यांच्या भजनाने झाला व आभार प्रदर्शन

गणपती उत्सवानिमित्त मयुरी लेडीज मॉल आयोजित स्पर्धेच्या बक्षीस समारंभप्रसंगी सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधिश चंद्रबुद्ध मोंगले, के. डी. खानदेशी. समवेत संचालिका सौ. मयरी लुणे–गुप्ता आदी.

'मयुरी लेडीज मॉल'आयोजित गणपती उत्सव स्पर्धांचे बक्षीस वितरण

नगर – मयुरी लेडीज मॉलतर्फे महिला व लहान मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघ आगरकर मळाचे अध्यक्ष के. डी. खानदेशी यांनी भुषवले असून प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त जिल्हान्यायाधिश चंद्रबुद्ध गोंगले होते.

यावेळी मयुरी लेडीज मॉलच्या संचालिका सौ. मयुरी लुणे– गुप्ता यांनी स्वागत केले तसेच के. डी. खानदेशी व चंद्रबुद्ध गोंगले यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचा बक्षीस समारंभ चंद्रबुद्ध गोंगले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महिला व लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. या स्पर्धेत ४ वर्षाच्या मुलापासून ते ८४ वर्षाच्या महिलांनी सहभाग घेतला.

यावेळी ॲड. विजय लुणे यांनी सामाजिक बांधिलकीतुन मयुरी लेडीज मॉल करीत असलेल्या कार्याची सविस्तर माहिती दिली. या महोत्सवाचे हे पहिलेच वर्ष असून पुढील वर्षापासून याचे भव्य स्वरुपात आयोजन करण्यात येईल असे त्यांनी सांगीतले.

माजी न्यायमुर्ती चंद्रबुद्ध गोंगले यांनी मयुरी लेडीज मॉल व्यवसायाबरोबर आपण समाजाचे काही देणे लागतो. या भावनेतून करत असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष के.डी खानदेशी यांनी अध्यक्षीय भाषणात मयुरी लेडीज मॉल ज्येष्ठ नागरिकांच्या कामासाठी वेळोवेळी ज्येष्ठांना आपले काही देणे समजुन सामाजिक बांधीलकीतुन नेहमीच मदत करीत असतात असे सांगितले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अशोक आगरकर, दत्तात्रय फुलसौंदर, ससे, नानासाहेब दळळी, कविटकर, श्रीमंत्री, ॲड. लोंखडे, हिरालाल शर्मा, अनिल मुथा, कातरे सर, सुहास मुळे, नुर आलम, सौ. जमदाडे, सौ. कुलथे, सौ. विधाते, श्रीमती खताळ, श्रीमती सरोज गुप्ता, श्रीमती गोपीका गुजराथी तसेच महिला व मुले उपस्थित होते.

पुकलकम म्हणतात यादिवशी इतर समाजाचे नागरीक शुभेच्छा देण्यासाठी केरळी बांधवांच्या घरी येतात

ओणम हा दिवस केरळी बांधवांसाठी मोठा उत्साहाचा आहे. ओणमच्या दिवसात वामनाच्या मूर्तीसह महाबलीच्या मूर्तीची स्थापना केली जाते. त्याचं पूजन मोठ्या उत्साहात केलं जातं. दक्षिण भारतामधील केरळमध्ये ओणम सणाचे फार महत्व आहे. तर शेतात धान्य उगवल्याच्या आनंदात १० दिवस ओणमचा सण पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. या दिवसात दक्षिण भारतीय महिला घराला फुलांनी सजवातात. या दिवसात केरळवासिय एकमेकांना शुभेच्छा देत सणाचा आनंद द्विगुणीत करताना दिसून येतात.

नगर शहरात ओणम सण उत्साहात साजरा

नगर – केरळ राज्यात नववर्षाची सुरुवात ओणम या सणापासून होते. त्यामुळे केरळी लोक हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. नगरमध्येही सर्वांनी हा उत्सव साजरा केला असून नगर शहरात केरळी व मल्याळी कुटूंबियांची असंख्य घरे आहेत. येथील मजदूर सेनेचे पदाधिकारी व भाजप साऊथ इंडियन सेलचे जिल्हाध्यक्ष वसंत सिंग यांच्या सावेडी येथील घरी आज ओणम साजरा करण्यात आला. त्यानिमित्त घरापुढे फुलांची रांगोळी काढण्यात आली होती.

नगरमध्ये 'ओणम' उत्साहात साजरा करण्यात आला. वसंतसिंग यांच्या घरी ओणम निमित्त फुलांची रांगोळी काढण्यात आली.

यावेळी वसंतसिंग, हेमा वसंत, गिरीश्मा वसंत, जानन्ही भागे, रोशनी भाटिया, वैष्णवी भोरे, प्राची मणेरीकर, अबिनी मुथियान आदी उपस्थित होते. सर्वांनी केळीच्या पानावर बसून केरळी जेवणाचा आस्वाद घेत पारंपरिक नृत्य केले

हा सण दिवाळी सारखा असून वामन अवतारातील बलीराजा/महाबलीच्या स्मरणार्थ हा उत्सव साजरा केला जातो. पातळात गेलेला बळीराजा प्रजेला भेटण्यासाठी या दहा दिवस पृथ्वी वर येतो त्याच्या स्वागतसाठी घराच्या पुढे फुलाच्या रांगोळ्या काढल्या जातात ओनम च्या सणांमध्ये सर्वात महत्त्वाचा दिवस असतो हनुमान तिरु ओनम या दिवशी मल्याळी नागरिक घराच्या समोर फुलांची रांगोळी काढतात त्याला याला

अहमदनगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या पाथर्डी शाखेचे २१ सप्टेंबर रोजी स्थलांतर

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या पाथर्डी शाखेचे नवीन जागेत स्थलांतर २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आमदार मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते बालाजी टॉवर, गुंजन कलेक्शन शेजारी, शेवगाव रोड, पाथर्डी येथे होणार आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक व पतसंस्थेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन इंजिनिअर विजयकुमार ढुबे हे राहणार असून यावेळी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज व शंकर महाराज भक्ती मठाचे माधवबाबा हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजिनियर सुरेश हथाळे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा संपुर्णताई सावंत, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष पराळकी, पाथर्डीचे माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, माजी नगराध्यक्ष मृत्युंजय गर्जे, उपनगराध्यक्ष नंदकुमार शेळके, माजी सभापती विष्णुपंत आकोलकर, बाजार समितीचे सभापती सुभाषराव बर्डे, खरेदी विक्री संघाचे सभापती बंडू पाटील पठारे, माजी नगरसेवक बंडू बोरुडे, मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त डॉक्टर बाळकृष्ण मरकड, नारायणराव धस, नामदेव लबडे, पुरुषोत्तम आठरे, रवींद्र वायकर, विष्णुपंत पवार उपस्थित राहणार आहेत.

पाथर्डी शाखेची स्थापना २००५ मध्ये करण्यात आली असून या शाखेकडे साडेचार कोटींचा व्यवसाय असून सध्या पाथर्डी शाखेत दीड कोटीच्या ठेवी आहेत संस्थेचे ठेवींवर आकर्षक व्याजदर असून ज्येष्ठ नागरिकांसाठी दहा टक्के महिलांसाठी दहा टक्के व इतरांसाठी नऊ टक्के व्याजदर आहे तसेच बचत खात्यावर ७ टक्के व्याज दिले जाते. सदर पतसंस्था ही आधुनिक असून संगणक प्रणालीचा वापर करत आहे. पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ हे उच्च शिक्षित असून विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. कार्यक्रमात उपस्थित राहावे असे आवाहन पतसंस्थेचे उपाध्यक्ष किशोर मरकड, स्थानिक शाखा संचालक बाळासाहेब सोनावळ, लक्ष्मणराव सोनावळ, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, स्थानिक सल्लागार समितीचे प्रमुख नारस्सेवक नामदेव लबडे, शाखाधिकारी गणेश खोर्द व सर्व संचालक मंडळाने केले आहे.

'गरुड कॅन्सर हॉस्पिटल'तर्फे २१ सप्टेंबर रोजी देहेरे व उंबरे येथे मोफत कॅन्सर तपासणी शिबीर

नगर – नगरमधील गरुड कॅन्सर हॉस्पिटल अँड रेडिएशन सेंटर येथे कॅन्सर वरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील कॅन्सर रुग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी २१ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र – देहेरे येथे सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १२ ते १.३० या वेळेत प्राथमिक आरोग्य केंद्र उंबरे येथे मोफत कॅन्सर तपासणी शिबीर होईल.

गरुड कॅन्सर हॉस्पिटल मधील कॅन्सर तज्ञ डॉक्टरांची टीम – रुग्णांचे मार्गदर्शन करणार आहेत.

जगामध्ये कॅन्सरचे पेशंटची संख्या वाढत आहे. सध्याच्या परिस्थितीत कॅन्सरवर अत्याधुनिक उपचार करुन कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकतो. सर्व प्रकारचे मॅंदूचे, तोंड व घशाचे, आतड्याचे, स्तन आणि गर्भाशयाचे कॅन्सरवर प्रभावी उपचार करण्यासाठी आधुनिक अमेरिकन रेडिओथेरपी मशीन तसेच अनुभवी कॅन्सर तज्ञ डॉक्टरांची टीम गरुड कॅन्सर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

कॅन्सरसाठी ऑपरेशन, केमोथेरपी आणि रेडिएशन हे सर्व आवश्यक आहे. शिबिरामध्ये कॅन्सर रुग्णांचे निदान झाल्यावर त्यांचे विमा पॉलिसीमध्ये तसेच शासकीय जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार गरुड कॅन्सर हॉस्पिटल येथे करण्यात येतील. रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने केले आहे.

श्री तुळजाभवानी देवीची पालखीचे सीमोल्लंघन सोहळ्यासाठी तुळजापूरकडे प्रस्थान

नगर – महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीची पालखी राहुरी येथून सीमोल्लंघन सोहळ्यासाठी शुक्रवारी (दि. २० सप्टेंबर) श्री तीर्थक्षेत्र तुळजापूरकडे प्रस्थान करण्यात आली. माजी मंत्री शिवाजीराव कर्डीले यांच्या हस्ते तुळजाभवानी देवीच्या पालखीचे पूजन व आरती करण्यात आली. यावेळी पालखीचे मुख्य पुजारी व मानकारी सागर भगत, सुदाम भगत, ज्ञानेश्वर भगत, शिवराम भगत, दीपक भगत, देविदास भगत, संदीप भगत, निलेश भगत, मंगेश भगत, वसंत भगत, महेंद्र भगत, निखिल भगत, विशाल भगत, ओम भगत, तेली समाजाचे अध्यक्ष संजय पन्हाळे, सुरेश घोवे, माऊलाहेब इंगळे, चाचा तनपुरे, आणा शेटे, गणेश खेरे, सुरेश बानकर, नारायण घोंगडे, विक्रम तांबे, बाळूनाना बानकर, शरद येवले, सचिन मेहेत्रे, सुभाष वराळे, उमेश शेळके, विक्रम भुजाडी, सुजय काळे, मकरंद कुलकर्णी, किरण भालेकर आदींसह भाविक उपस्थित होते.

श्री तुळजाभवानी देवीची पालखी राहुरी येथे सिमोल्लंघन सोहळ्यात प्रस्थान करताना माजीमंत्री शिवाजीराव कर्डीले. समवेत मुख्य पुजारी आदी.

देवीच्या सीमोल्लंघन सोहळ्यासाठी पालखी तयार करण्याचा व आणण्यासाठी अनेक समाजाचा मान आहे. दरवर्षी पालखीसाठी लागणारे उभे लाकूड माळी, मेहेतर इतर कामासाठी सागवान व बोरीचे लाकूड पालखीचे पटेल गायत्री सॉमिलकडून घेतले जाते. खांद्यासाठी जो मोठा दांडा लागतो तो पूर्वीपासून जुनाच वापरला जातो. संपूर्ण लाकूड गोळा झाल्यानंतर ती पालखी तयार करण्याचा मान के. उमाकांत सुतार घराण्याकडे असून, सध्या त्यांचे वंशज अरुण सुतार हे मानकारी आहेत. लाकडाची कतार करण्याचे काम धनगर समाजाचे भांड घराणे तर खिळे पट्टी करण्याचे काम हे लोहार समाजाचे रणसिंग घराण्याकडे आहे. संपूर्ण पालखी तयार झाल्यावर खन नारळांनी पालखीची ओटी भरून भंडारा उधळण करणा आई राजा उदो उदो! च्या जय घोषात पालखी राहुरी येथून तुळजापूरला रवाना करण्यात येते.

तुळजापूर येथील शुक्रवार पेठेत पलंग पालखी कट्टयावरती जानकोजी भगत यांच्या समाधी शेजारी आणण्यात येते तेथे पलंग पालखीचे पूजन झाल्यानंतर मंदिर संस्थानकडून मनाचा एक रुपया व नारळ देऊन सीमोल्लंघनासाठी आमंत्रण देण्यात येते. ही पालखी वाजत–गाजत साधारण पहाटे ४ वाजे पर्यंत मंदिरात येते व या पालखीत देवीचा सीमोल्लंघन सोहळा पार पडतो, अशी माहिती पालखीचे मुख्य पुजारी व मानकारी सागर भगत यांनी दिली.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

गुडघेदुखी आणि रशियन तंत्रज्ञान

■ डॉ. सुहास शहा
अस्थिरोगतज्ज्ञ,
संपर्क : ९३२२२३५०४२

मानवी शरीराचा ९० टक्के भार सांभाळणाऱ्या पायांमध्ये गुडघ्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. शारीरिक रचनेमध्ये गुडघा असल्यामुळे आपल्याला चालणे, बसणे, वर चढणे, खाली उतरणे, गाडीवर बसणे यांसारख्या क्रिया करणे शक्य होते. अत्यंत सूक्ष्म तंतूंपासून बनलेले गुडघ्यातील अस्थिबंध हाडांच्या सांध्यांना जोडून ठेवण्याचे काम करतात. मांडी आणि पोटरीला जोडणाऱ्या गुडघ्यावर या तंतूंचे आवरण असते. गुडघ्याच्या खालील गादी हे शरीराचे वजन पेलते. त्यामुळे लिगामेंटची दुखापत ही गंभीर स्वरूपाच्या संधिवाताला कारण ठरते. अँटीरियर क्रूसिएट लिगामेंट (एसीएल), पोस्टरियर क्रूसिएट लिगामेंट(पीसीएल), मेडियल कोलेटरल लिगामेंट (एमसीएल), आंतर लेटरल कोलेटरल लिगामेंट (एलसीएल) हे चार मुख्य अस्थिबंधन गुडघ्याला आधार देतात. या लिगामेंटना दुखापत झाल्यास गुडघ्याचे कार्य बाधित होते. सामान्यतः गुडघ्याला मार लागणे, मुरगाळणे, जॉइंट हायपरएक्स्टेन्शन यांसारख्या दुखापतींमुळे गुडघा बाधित होऊ शकतो. यामध्ये सर्वाधिक इजा एसीएलला होते. हे लिगामेंट गुडघ्याच्या सांध्यांमध्ये असतात आणि नडगीच्या हाडला (टिबिया) मांडीच्या हाडाच्या पुढे जाण्यापासून रोखतात. परिणामी, गुडघे स्थिर राहतात. दुखापतीमुळे अनेकदा याची दिशा बदलते. गुडघ्याला दुखापत झाल्यास आतील सांध्यांभोवती सूज येऊ शकते. फुटबॉल, बास्केटबॉल, सॉकर आणि स्कीईंग यांसारख्या क्रीडाप्रकारांमध्ये एसीएलला दुखापत होण्याचा धोका अधिक असतो. याखेरीज विविध अघातांतमध्ये गुडघ्याला इजा होण्याची शक्यता असते.

गुडघेदुखीचा त्रास सुरू झाला की अनेक जण पेनकिलरचा वापर करताना दिसतात. दुखापत गंभीर असेल किंवा आतील हाड तुटले असल्यास ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला जातो. न जुळणारी हाडे, डायबेटिक न्युरोपॅथी यांसारख्या आजारांमध्ये गुडघा बाधित झाल्यास नी रिप्लेसमेंट सर्जरीसारखी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला जातो. वास्तविक पाहता, आज आधुनिक उपचारपद्धतीमुळे नैसर्गिक सांधा वाचवून गुडघेदुखीवर उपचार करता येतात.

खरे तर याला आधुनिक उपचारही म्हणता येणार नाहीत. कारण १९५० मध्ये प्रो. एलिझारोव्ह या रशियन सर्जननी गुडघ्यांच्या दुखापतींवरील ही उपचारप्रक्रिया विकसित केली होती. यामध्ये गुडघ्याच्या हाडाला एक फिक्सेटर लावून १५० किलोने वायरने टेन्शन दिले जाते. यामुळे रुग्णाला फ्रेंचर असले तरीही तो चालू शकतो. यामध्ये गुडघ्याच्या हाडावर छेद देऊन नैसर्गिकरित्या त्याची उंची वाढवता येऊ शकते. अशा पद्धतीने उंची वाढवण्यासाठी रशियन शस्त्रक्रिया ही एकमेव पद्धत आज उपलब्ध आहे. न जुळलेली हाडे, हाडांमध्ये इन्फेक्शन असेल किंवा पोलिओमुळे उंची कमी झालेली असेल किंवा सेरेब्रल पाल्सीसारख्या व्याधी, वाकडे हाड, वाकडे पाय यांसारख्या समस्यांवर ही उपचारपद्धत अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक ठरत आहे. इंटर्नल इम्प्लांट पद्धतीने उंची वाढवण्याचा भारतातील पहिला प्रयोग आम्ही २०१५ मध्ये केला होता. ऑस्ट्रेलियातील एका वकिलावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

गुडघेदुखीवर जॉइंट नी रिप्लेसमेंटमध्ये कृत्रिम सांधेरोपण केले जात असल्याने या कृत्रिम सांध्याच्या आधारे रुग्णांना आयुष्य व्यतीत करावे लागते. त्याऐवजी रशियन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नैसर्गिक गुडघा सदृढ करून तो कायम ठेवणे शक्य होते. यामध्ये गुडघा वाकडा असेल तर फिक्सेटरने तो सरळ केला जातो. परिणामी त्यातील दुखावा दूर होण्यास मदत होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे फिक्सेटरच्या साहाय्याने वाकडे गुडघे असल्याने एका पायावर चालावे लागणाऱ्या रुग्णांना तीन ते चार दिवसांमध्ये दोन्ही पायांआधारे चालता येणे शक्य होते. गुडघ्यांची हालचालही पूर्ववत होते. म्हणजे रुग्णांना मांडी घालून बसणे, भारतीय पद्धतीने शौचास बसणे या सर्व क्रिया करता येतात. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, फिक्सेटर लावून गुडघे सरळ केल्यामुळे गुडघ्यांच्या आतमध्ये असणारे कार्टिलेज पूर्ववत होते. त्यामुळे कार्टिलेज एकदा खराब झाले की ते पुन्हा सुव्यस्थित होत नाही, हा गैरसमज लोकांनी दूर करणे गरजेचे आहे. तात्पर्य, गुडघ्याला दुखापत झाली, गुडघ्याचे हाड मोडले, गुडघ्यात पाणी झाले, वाटी सरकली अशा क्रिकेटच्या समस्या निर्माण झाल्यास घाबरून न जाता आणि नैसर्गिक गुडघा काढून टाकून कृत्रिम गुडघा जोडण्याचा निर्णय न घेता रशियन उपचारपद्धतीचा पर्याय अवलंबून पाहायला हवा. ◆◆◆

स्मृतीतल्लखतेत स्त्रियाच भारी!

स्त्री व पुरुष यांच्या मेंदूतील जैविक मंडलांची (सर्किटस्च वेळी (मल्टिटास्किंग) करू शकत नाहीत. तुलनेने स्त्रियांची स्मृती जास्त तल्लख असते, त्यांची सामाजिक कौशल्ये पुरुषांच्या तुलनेत जास्त असतात, असे एका संशोधनात आढळून आलेले आहे. या संशोधनात पेनसिल्वानिया विद्यापीठाच्या पेरेलमान स्कूल ऑफ मेडिसिन या संस्थेतील रेडिओलॉजी विभागाच्या सहायक प्राध्यापक रागिणी वर्मा यांचा मोठा सहभाग आहे.

रागिणी वर्मा यांनी म्हटले आहे, की स्त्री व पुरुषांमध्ये मेंदूतील मंडलांची जोडणी म्हणजे कनेक्टोम्स कशा प्रकारची असतात, याचा अभ्यास एवढा विस्तृत प्रमाणात प्रथमच करण्यात आला आहे. वर्मा व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या संशोधनात असे दिसून आले, की मेंदूच्या पुढच्या भागापासून मागच्या भागापर्यंतची न्यूरॉनची जोडणी ही मोठी एकाच अर्धगोलार्धात अशा प्रकारे पुढून मागे झालेली असते. याचा अर्थ आकलन व समन्वयीत कृती यासाठी पुरुषाच्या मेंदूतील मंडलांची जोडणी योग्य प्रकारे झालेली असते.



स्त्रियांमध्ये ही जोडणी डाव्या व उजव्या अर्धगोलार्धात झालेली असते. त्यामुळे त्यांच्यात आंतरप्रेरणा, विश्लेषणात्मक क्षमता यांच्यातील समन्वय चांगला असतो. स्त्री व पुरुषांच्या मेंदूचे नक्शे खूप फरक दाखवणारे आहेत व पूरकही आहेत. मानवी मेंदूच्या रचनेचा अभ्यास केल्याने काही कामे पुरुष चांगली करतात तर काही कामे स्त्रिया चांगले करतात, हे नेमके कसे घडते यावर प्रकाश पडला आहे, असे वर्मा यांनी सांगितले. त्या दिल्ली आयआयटीच्या विद्यार्थिनी होत्या व त्यांनी संगणक दृष्टी व गणित यात डॉक्टरेट केलेली आहे. या अभ्यासात वर्मा व त्यांच्या सहकाऱ्यांनी मानवी मेंदूतील लिंगविशिष्ट भेदांचे निरीक्षण केले. त्यात आठ ते बावीस वयोगटातील ५२१ स्त्रिया व ४२८ पुरुष यांच्या मेंदूचा अभ्यास डिफ्युजन टेन्सर इमेजिंग तंत्राने (डीटीआय) करण्यात आला.

डीटीआय हे पाण्याचर आधारित प्रतिमा तंत्र असून त्यात मेंदूच्या सर्व भागातील धाग्यांची जोडणी दिसते व संपूर्ण मेंदूची यंत्रणा मानले जाणाऱ्या कनेक्टोमचीही रचनाही दिसून येते. स्त्रियांमध्ये सुप्राटेन्टोरियल भागात जोडणी जास्त प्रमाणात दिसून येते व त्यात सेरेब्रम हा भागही समाविष्ट होतो. मेंदूच्या डाव्या व उजव्या अर्धगोलार्धांच्या दरम्यान असलेला हा सर्वात मोठा भाग असतो.

पुरुषांमध्ये प्रत्येक अर्धगोलार्धात मंडलांची जोडणी मोठ्या प्रमाणात असते. याउलट सेरेबेलम या मेंदूच्या स्नायू नियंत्रण करणाऱ्या भागात पुरुषांच्या मेंदूतील आंतर अर्धगोलार्धातील जोडणी ही जास्त प्रमाणात दिसून येते व स्त्रियांमध्ये मेंदूच्या अर्धगोलार्धातील अंतर्गत जोडणी जास्त प्रमाणात दिसून येते. या जोडण्यातील फरकामुळे पुरुषांमध्ये अधिक समन्वयित कृती करण्याची क्षमता येते. कारण मेंदूच्या पुढच्या भागात होणारी कृती व मागच्या भागात होणारे आकलन यांची जोडणी सेरेबेलम व कॉर्टेक्स यांच्या दरम्यान व्यवस्थित होते असे त्यांचे म्हणणे आहे. 'प्रोसिडिंग ऑफ नॅशनल ॲकडेमी ऑफ सायन्सेस' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. ◆◆◆

'ग्रीन टी'लावा, डास पळवा!

डासनाचावा उपद्रवी कीटक निसर्गाने का बनवला असावा, याचे आपल्याला नेहमीच कोडे पडते. झोपल्यावर सतत कानाजवळ येऊन कर्कश 'गुंई गुंई' आवाज करून झोपमोड करणाऱ्या, चावून बेजार करणाऱ्या आणि चावल्यावर मलेरियासारख्या अनेक आजारांच्या रोगजंतूंचा फैलाव करणाऱ्या डासांपासून कशी सुटका करवून घेता येईल याबाबत सातत्याने संशोधन सुरू असते. डासांपासून मुक्ती मिळवण्यासाठी काशी हिंदू विद्यापीठातील आयुर्वेद विभागाच्या प्रमुखांनी एक कमी खर्चिक व सोपा उपाय शोधून काढलेला आहे. त्यांच्या मते ग्रीन टी ची रोपे लावल्याने डास पळून जातात.

आयुर्वेद विभागाचे प्रमुख के. एन. द्विवेदी यांनी 'ग्रीन टी'च्या रोपांवर संशोधन केल्यानंतर असा दावा केला होता की, 'ग्रीन टी'मुळे अतिशय घातक अशा डासांच्या प्रजातींपासूनही संरक्षण होते. या वनस्पतीच्या वासामुळे डास पळून जातात. ग्रीन टी ही वनस्पती जुन्या काळापासून अस्तित्वात असून ती खेडोपाड्यात सहज उपलब्ध आहे. या वनस्पतीचे विविध उपयोग मात्र लोकांना माहीत नाहीत. ज्या घराभोवती 'ग्रीन टी'च्या वनस्पतीची लागवड आहे तेथे डास अजिबात फिरकत नाहीत, असा दावा द्विवेदी यांनी केलेला आहे. 'ग्रीन टी'चा वास हा लिंबासारखा असतो. त्यामुळे मधमाशा व डास दोन्ही घराजवळ येत नाहीत. ही डासांना पळवाण्याच्या वनौषधींवर आधारित पद्धत अतिशय स्वस्त अशी आहे. सध्या डासांना मारण्यासाठी जी औषधे उपलब्ध आहेत त्या बहुतांश औषधांमध्ये या वनस्पतीचा रस वापरलेला असतो. जर या वनस्पतीची पाने कुटून अंगाला लावली तर कमी डास तुमच्याकडे फिरकत नाही, असे द्विवेदी यांनी सांगितले. या वनस्पतीला आयुर्वेदात क्रिरव म्हटले जाते व त्याचे शास्त्रीय नाव सिंबोपोगन स्कुलताश असे आहे. ◆◆◆

आपल्या देशात अनेक अनोखी गणेश मंदिरे आहेत; मात्र छत्तीसगडमधील दंतेवाडापासून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या ढोलकल पर्वतावर एक अनोखे गणेश मंदिर आहे. खरे तर हे मंदिर बंदिस्त नसून तिथे तब्बल तीन हजार फूट उंच पर्वतशिखरावर उघड्यावरच विराजमान असलेले गणपतीबाप्पा आहेत. एकदंत गणपतीची एक पुरातन मूर्ती याठिकाणी स्थापन आहे. ही मूर्ती अतिशय दुर्लभ आहे. ती किमान एक हजार वर्षे जुनी असल्याचे म्हटले जाते.

या गणपतीबाबत प्रचलित एका दंतकथेनुसार या पर्वतावरच परशुराम आणि गणपतीमध्ये एक युद्ध झाले होते. यात परशुराम यांचे आयुध 'परशु'चा वारने गणपतीचा एक दात तुटला होता आणि त्यानंतरच गणपतीला 'एकदंत' हे नाव प्राप्त झाले, असे म्हणतात. ढोलसारखी आकृती असल्याने या पहाडाला 'ढोलकल' असे नाव पडले. या पर्वताच्या नावावरूनच या गणपतीला 'ढोलकल गणेश' असलेही संबोधले जाते. या मूर्तीला चार हात असून उजव्या हातात परशु, डाव्या हातात तुटलेला एक दात तर अन्य एका हातात अक्षरमाळा आणि मोदक आहेत. विशेष म्हणजे बाप्पांची ही मूर्ती आयुध रुपातील असून बाप्पा येथे ललितासन मुद्रेत बसलेले आहेत. बाप्पांची अशा प्रकारची मूर्ती अन्यत्र कुठेही पहायला मिळालेली नाही.

या मूर्तीची स्थापना ११ व्या शतकात छिंदक नागवंशी राजांनी दंतेवाडा क्षेत्राच्या रक्षक स्वरूपात ढोलकल पहाडावर केली होती. नागवंशी राजांनी या गणपतीच्या मूर्तीची निर्मिती करून त्यावर नाग अंकित केला आहे. मूर्तीच्या संतुलनासाठी शिल्पकारांनी त्यावर साखळीचा उपयोग केला आहे. दक्षिण बस्तरच्या भोगा आदिवासी समाज आपली उत्पत्ती 'ढोलकट्टा' ढोलकलच्या महिला पुजारीपासून झाल्याचे मानतात. सर्वात आधी भोगा जनजातीच्या महिलेचेच येथे पूजा सुरू केली, असे मानले जाते. पहाटेच्या वेळी या महिला पुजारीच्या शंखनादाने संपूर्ण ढोलकल पर्वत शिखर गुंजायचे, असे सांगितले जाते. आजदेखील या महिला पुजारीचे वंशज या ढोलकल गणपतीची पूजा करतात. या गणपतीची मूर्ती ही येथील इंद्रावती नदीच्या खोऱ्यातील शिळेपासून तयार करण्यात आली आहे.

बैलाडील पर्वत रांगेचे हे सर्वात उंच शिखर आहे. ११ व्या शतकातही इतक्या समुद्र पद्धतीने मूर्तीची रचना केली जात असल्याचे या मूर्तीवरून स्पष्ट होते. दरवर्षी या पर्वतस्थली असलेल्या फरसपाल या गावात ३ दिवसीय जत्रेचे आयोजन केले जाते. या दरम्यान परशुराम, ढोलकल गणपतीसह येथील स्थानिक देवी देवतांची पूजा केली जाते. ढोलकल पर्वतावरील या गणपतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या पुरातन गणपतीच्या मूर्तीवर कुठल्याही प्रकारचे छत्र किंवा शिखर नाही. या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी जवळपास अडीच तासांचा प्रवास करून उंच डोंगरची चढण चढावी लागते. ◆◆◆

सांधेदुखीवर प्रभावी तेलचिकित्सा

■ डॉ. सुरेश मिर्जापूर
बीएएमएस, नागपूर,
संपर्क : ९३७३९९२९२

कडक उन्हाळ्यामुळे घामाच्या धारा लागून अस्वस्थ झालेल्या मनाला पावसाळा हा ऋतू नैसर्गिक गारवा देणारा ठरतो. पण पावसाळा आणि हिवाळा हे दोन ऋतू सांधेदुखीचा त्रास असणाऱ्यांसाठी काहीसे त्रासदायक ठरतात असे दिसून आले आहे. सध्या महाराष्ट्रात वाढीस लागलेल्या चिकनगुनिया या विषाणूज्य आजारामध्येही हाडाचे सांधे दुखण्याची समस्या जाणवते. सांध्यांमधील वेदनांमुळे रुग्णाला प्रचंड त्रास सोसावा लागतो.

आ युर्वेदानुसार, सांधेदुखीसाठी कारणीभूत ठरणा-या आजारामध्ये आमवाताचा क्रमांक बराच वरचा लागतो. एका पाहणीनुसार, आजघडीला जगातील सुमारे एक ते दीड टक्के लोक या आजाराने ग्रस्त आहेत. यामध्ये छोट्या व मोठ्या सांध्याच्या ठिकाणी सूज व वेदना हे प्रमुख लक्षण असते. सांधेदुखीतील वेदना इतक्या तीव्र स्वरूपाच्या असतात की, हालचाल करणेही कठीण होऊन जाते. विशेषतः सकाळी उठल्यावर एक-दोन तास सांधे आखडणे हे प्रमुख लक्षण यामध्ये दिसून येते. काही रुग्णांमध्ये सांध्याच्या जवळ गाठी निर्माण होतात. यामुळे रुग्णांची संपूर्ण दिनचर्याच कोलमडून जाते. त्याचे पुन्हा मनारोग्यावर होणारे परिणाम वेगळेच असतात.

अशा वेळी बहुतांश जण सुरुवातीच्या टप्प्यात किंवा प्राथमिक अवस्थेमध्ये औषधविक्रेत्यांकडून वेदनाशामक गोळी किंवा पेनकिलर घेऊन आपले काम सुरू ठेवतात. परंतु दीर्घकाळ अशा गोळ्यांच्या सेवनामुळे आरोग्यावर विपरित परिणाम होऊन त्यातून नव्या समस्या उद्‌भवतात. सबब अशा गोळ्यांच्या दुष्परिणाम चुकूनही अडकता कामा नये. विशेषतः साठी ओलांडलेल्या व्यक्तींनी वारंवार पेनकिलर घेणे कटाक्षाने टाळावे.

अॅलोपॅथी उपचारांमध्ये सांधेदुखी, संधिवात यांना आर्थ्रायटिस मानून उपचार केले जातात. सांध्यांमध्ये कार्टिलेज नावाचा घटक असतो. या कार्टिलेजमुळे सांध्यांची हालचाल योग्यरीत्या होत असते. कोणत्याही कारणास्तव कार्टिलेजची झीज झाली असता सांधेदुखी वाढते व या वेदना असह्य होतात. सांध्यांमधील हाडे एकमेकांना घासली जातात त्यामुळे गुडघ्यामध्ये सूज येऊ लागते. या स्थितीला सांधेदुखी किंवा ऑस्टिओआर्थरायटिस असे म्हटले जाते.

वास्तविक, आपल्याकडील आयुर्वेदिक उपचार पद्धती आणि त्यातील औषधी तेलाच्या साहाय्याने मालीश करणे यामुळे सांधेदुखी, संधिवात या समस्येने ग्रस्त असणाऱ्यांना आराम मिळतो असे दिसून आले आहे. वनौषधींनी युक्त तेलाने केलेल्या मालिशमुळे आखडलेल्या स्नायूंना ऊर्जा मिळते. तेथील रक्तापिसरणाची प्रक्रिया सुरळित होऊन स्नायू लवचिक होतात. त्यावबरोबर सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या स्नायूंना बळकटी मिळते.

सामान्यतः यामध्ये चार प्रमुख तेलांचा वापर प्रभावी ठरतो, असे आयुर्वेद सांगते. त्यापैकी एक म्हणजे महानारायण तेल. हे तेल बिल्व, अश्वगंधा, बृहती, बाला, स्वदमराष्ट्र, बुद्ध, अतिबाला, तैला, शतावरी, रसना, मिशी, कुष्ट, हरिद्रा, अशा विविध वनौषधींनी बनवले जाते. महानारायण तेलाच्या नियमित मसाजाने हाडांचे दुखणे, सांधेदुखी, संधीवात, हात-पाय कंप पावणे, हाता-पायांची बोटे आखडणे, पिंडऱ्यांचे स्नायू आखडणे यांसारख्या समस्या दूर होण्यास मदत होते. त्याचबरोबर स्नायू व हाडांच्या बळकटीसाठीही त्याचा प्रभावी उपयोग होतो. महाविषगर्भ तेलाच्या मसाजाने सांध्यांना आलेली सूज, गुडघ्यांची हालचाल करताना येणारा आवाज यांसह सांध्यांमधील वेदना कमी होण्यास मदत होते. प्रसारिणी तेलाद्वारे नियमित मसाज केल्यास स्नायू आखडण्याची जुनाट समस्याही दूर होते. तसेच हाडांची झीज भरून येण्यासही मदत होते. महामाश तेलाच्या मसाजामुळे सर्व्हायकल स्पॉंडिलोसिसह संधीवात, अधिमवायू यांसारख्या व्याधींमध्येही चांगले परिणाम दिसून येतात. या पाचही तेलांचे मिश्रण असणारे पेनेक्सील तेलही यामध्ये प्रभावी ठरते.

आयुर्वेदिक तेलांनी मसाजामुळे सांध्यांमधील वेदना कमी होण्याबरोबरच एकूणच शरीरातील रक्तापिसरण वाढल्यामुळे उत्साही वाटते. झोप चांगली लागते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे याचे कोणतेही दुष्परिणाम शरीरावर होत नाहीत. त्यामुळे पावसाळा आणि थंडीच्या ऋतूमध्ये संधीवात किंवा सांधेदुखीचा त्रास असणाऱ्या रुग्णांसाठी, तसेच चिकनगुनियातील सांधेदुखीपासून सुटका मिळवण्यासाठी ही तेलमसाजाची थेरपी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. ◆◆◆

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

आज भक्तामर संपुटका दहावा गाथा सांगण्यात आले. ह्याचे महत्त्व इतक्या सोप्या पद्धतीने सांगण्यात आले, अहो, भुवनलंकार! हे भुवन भूषण! भूतनाथ, जो तुमच्या गुणांचे चिंतन करतो तो तुमच्यासारखाच सद्गुणी होतो. सेठ जसा नकराला स्वतःसारखा बनवतो.

मानूस जसा वाटतो तसा बनतो. जेव्हा चोराचा मित्र हा चोर होतो, पण जेव्हा संतांचे मित्र संत असतात, तसेच भगवंताच्या भक्ताला देवत्व प्राप्त होते. हे आयुष्य खूप सुंदर आहे, पण ते नीट समजून घेण्याची गरज आहे. जर हे आयुष्य कसे जगावे हे समजून घेतले तर तुमचे घर, आयुष्य हे देवाची प्रतिमा आहे. नाहीतर सैतानाचे घर प्रस्तुत श्लोकात अकरा (११) वेळा 'म' अक्षराचा वापर आला आहे. भक्ताला ईश्वर भक्तीसाठी प्रेरित करत आहे. ''अकरा'' (११) 'म' भक्त देव भक्ति, भन्ते यांचे रहस्य भावनिक प्रभाव, भेदभाव, भावेची टोकाची, भावनांची टोकाची, भूतनाथ, भद्रा, मुळी भुज्जो.

हे भूतनाथ, सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाची जबाबदारी आहे. भुवन भूषण, जो संपूर्ण जगाला देदीप्यमान आणि सुंदर बनवतात. हे प्रभू,तुम्ही वर मध्य आणि पाताळ या तीन ब्रह्मांचे रत्न आहात, आणि सर्व प्राणिमात्रांचे स्वामी आहात. आईची ममता फक्त तिच्या मुलापर्यंतच असते. परंतु तुम्ही संपूर्ण प्राणिमात्रप्रती असलेल्या नैसर्गिक दयेमुळे स्वांच्या जीवाचे कल्याण करण्यासाठी तुम्ही त्रिलोकनाथ आहात

जसे :- पाण्याला विचारले तुझा आकार कसा आहे? तो म्हणेल, कुठल्याही डबा, बादली, पातीलं ह्यात ठेवा मी तसा आकार घेईल. मग भक्ताचे रूप काय? देवासारखा. कारण असे म्हटले आहे की, ''अप्पा सो परमप्पा'' भक्ताचे उद्दिष्ट आत्मापासून परमात्मा मनुष्यातून नारायण आणि जीवात शिव बनणे हे असते. आचार्यश्री म्हणतात, मलाही उपासकासारखेच स्वरूप प्राप्त होवो. बन ओसन म्हणे पहिला महासागर आणि दुसरा ज्ञानाचा महासागर जो जगाचा सागर पार करतो तो ज्ञानाचा सागर पार करतो.

जगातील देव भौतिक सुखामध्ये मग्न आहेत. पाताळातील नरक जीभ दहा प्रकारच्या वेदनांनी ग्रस्त आहे. मध्य जगात राहणारे मानव आणि प्रिमितीय प्राणी देखील बाह्य सुखदुःखाच्या आसक्तीने त्रस्त आहेत. तुम्ही ह्या सर्वांवर कृपा करतात. तुमच्या मनात कोणाबद्दल भेदभाव किंवा पूर्वग्रह नाही. जे भक्त ह्या जगात दुःखाने भरलेले आहे आणि त्यातून मुक्त होण्यासाठी तुमच्या चरणी येतात. तुम्ही त्यांना तुमच्या बरोबरीने बनवतात, तो नम्र आत्म्यापासून महात्मा बनतो. प्रभु तुम्ही येथेच फार महत्त्वाचे आहात.

जैन धर्मात आत्म तृप्ती आणि पुरुषत्वाला महत्त्व आहे. गौतम स्वामी विमलमतीसह भगवान महावीरांची शुद्ध भक्ती केली, ते अनंतकाळ एकच रूपात राहिले. जसे मिठाचा गोळा पाण्यात विरघळतो, तसे आपण भगवंतात विलीन होऊ या!

– सौ. सविता चोरडिया

छावनी परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची पथनाट्याद्वारे स्वच्छतेबाबत जनजागृती

नगर – भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी स्वच्छ भारत मिशनचा एक महत्त्वाचा भाग म्हणून १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबर या कालावधीत छावणी परिषद कार्यालयाद्वारे स्वच्छता ही सेवा अभियानाचे आयोजन छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगे. रसेल डिसोजा, मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे व नामनिर्देशीत सदस्य वसंत राठोड, स्वच्छता निरीक्षक रमेश साके, गणेश मोर यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

या वर्षी या अभियानाचे घोषवाक्य 'स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता' हे आहे. समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती करणे तसेच नागरिकांचा अभियानात सहभाग वाढवणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता सुनिश्चित करणे आणि सफाई मित्र सुरक्षित अभियान राबवणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. अभियानादरम्यान स्वच्छता प्रतिज्ञा, मॅरेथॉन, जनजागृती कार्यक्रम, स्वच्छतेच्या महत्त्वावर चर्चासत्र आणि कार्यशाळा, मेळावा, मानवी साखळी, सायकल रॅली, एक पेड मा के नाम, घरोघरी जनजागृती मोहीम, सांस्कृतिक कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आदी उपक्रम समाजसेवी संघटना यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहेत.

या अंतर्गतच छावनी परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक संजय शिंदे व सीएसआरडीचे सॅम्युएल वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली सीएसआरडी मधील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने शुक्रवार बाजारतळ, मिंगारवेस, सदरबाजार आदी विविध ठिकाणी स्वच्छता पथनाट्याद्वारे प्लॅस्टिक कचरा, घरगुती स्वच्छता, कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाट याबाबत नागरिकांमध्ये जाणीवजागृती करण्यात आली.

या अभियानात नागरिकांनी योगदान देऊन आपले शहर स्वच्छ, सुंदर व हरीत करण्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन छावनी परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी यावेळी केले.

स्वच्छता ही सेवा अभियानाचे आयोजन छावणी परिषद शाळेतील विद्यार्थी पथनाट्याद्वारे स्वच्छतेबाबत जाणीव जागृती करून देताना दिसत आहेत.

'पारस' हा भारताचा विश्वसनीय ब्रॅन्ड म्हणून नावारूपास

ब्रॅन्ड ॲम्बेसिडर सिनेअभिनेते अनिल कपुर यांचे प्रतिपादन; ग्रुपची गोवा येथे डिस्ट्रीब्युटर्स मीट

नगर – सर्वांच्या सहकार्य व सहयोगाने पारस हा भारताच्या प्रत्येक कानाकोपर्यात जावून भारताचा विश्वसनीय ब्रॅन्ड म्हणून नावारूपास आलेला आहे, असे गौरवोद्गार पारस ग्रुपचे ब्रॅन्ड ॲम्बेसिडर सिने अभिनेते अनिल कपुर यांनी केले.

पारस ग्रुपने गोवा येथील ग्रँड–हयात हॉटेलमध्ये भारतातील डिस्ट्रीब्युटर्सच्या मीटचे आयोजन केले होते. ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर पेमराज, संतोष, सतिष, डायरेक्टर प्रणेश, रोनक, रोहन, गौरव, प्रसन्न बोथरा यांच्या बरोबरच ग्रुपचे ब्रॅन्ड ॲम्बेसिडर सिने अभिनेते अनिल कपुर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी ग्रुपचे केंद्री हेड अनुप जैस्वाल, भारतातील ३०० हुन्ही अधिक डिस्ट्रीब्युटर्स व सेल्स टिम सहभागी झाली होती.

पारस या भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेल्या ब्रॅन्ड पारस ब्रॅण्डचा गोवा येथील ग्रँड हयात हॉटेलमधील डिस्ट्रिब्युटर्सच्या मीट प्रसंगी पारस ग्रुपचे ब्रॅन्ड ॲम्बॅसिडर सिने अभिनेते अनिल कपूर. समवेत पॅरिस ग्रुपचे बोथरा कंपनीचे सदस्य.

यावेळी गेवगेळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी गत वर्षभरात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल डिस्ट्रीब्युटर्स व सेल्स टिम सदस्यांचाही सम्मान अनिल कपुर व संचालकांच्या हस्ते करण्यात आला.

पारसने आपले प्रत्येक उत्पादन क्वालिटीने परिपुर्ण असावे असा मानस ठेवून वेगवेगळी उत्पादनाची मोठी श्रेणी तयार केली आहे. यामध्ये प्लम्बिंग सिस्टीम, ड्रेनेज सिस्टीम, ब्लो–मोल्डेड वॉटर टँक, पीव्हीसी पाईप, एचडीपीई, केसिंग, गार्डन, ब्रेडेड पाईप, पीटीएमटी बाथरूम फिटिंग्ज, कन्व्हुट पाईप आणि फिटिंग, पारस मिरॅकल प्लास्टिक ॲग्रीकल्चरल, इंडस्ट्रियल, गृहोपयोगी व क्लिनिंग उत्पादनांची एकाहून एक दर्जेदार उत्पादनांची निर्मिती करत आहे.

मॅनेजिंग डायरेक्टर पेमराज बोथरा यावेळी म्हणाले की, पारस कालानुरूप आपल्या उत्पादनात बदल करून ग्राहकांना अधिकाधिक चांगली उत्पादने देण्याचा यशस्वी प्रयत्न करीत आहे.

या मीटमध्ये ग्रुपचे डायरेक्टर प्रणेश, रोनक, रोहन, प्रसन्न यांनी नेक्स्ट लेव्हल या कन्सेप्ट विषयी माहिती देतांना येणारी नवनवीन उत्पादने, विक्रीच्या संधी याविषयी सर्व डिस्ट्रीब्युटर्स व सेल्स टिमला संपूर्ण माहिती देवून त्यांच्या शंकांचे निरसन केले. सीए गौरव बोथरा यांनी सीएसआर फंड विषयी माहिती देवून कंपनीच्या प्रगतीचा आलेख सादर केला.

नगर – अहमदनगर जिल्ह्याचे प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यालांगळा यांची अमरावती येथे बदली झाली असता, कॉटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला. या निरोप कार्यक्रमाप्रसंगी कॉटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष ॲड. सुरेश लगड, सचिव ॲड. राजेश कावरे, माजी अध्यक्ष ॲड. शिवाजी (आण्णा) कराळे, ॲड. अनिता दिघे, ॲड. प्रणाली भूयार–चव्हाण, ॲड. गौरी सामलेटी, ॲड. विजया कोतकर, ॲड. विराज लगड आदी.

निर्मल ॲडव्हर्टायझिंगचे स्व. रमेशचंद्र बाफना यांच्या जन्मदिनानिमित्त निर्मल स्टाफ तर्फे मुकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. यावेळी बाफना परिवारातर्फे प्रतिमेचे पुजन व हार अर्पण करण्यात आला. महावीर इंटरनॅशनलचे मनोज शेटीया, सतिष चोपडा, सुशालाल ललवाणी, दिपक बोथरा, अरूण पारख, बाबुशेठ लोढा व संतोष बाफना, महेश मेटकर उपस्थित होते. मनोज शेटीया यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून आपले मनोगत व्यक्त केले.

युनियन अध्यापक विद्यालयात जर्मन भाषा प्रशिक्षणासाठी कागदपत्र पडताळणी शिबीर

नगर – शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर आयोजित जर्मन भाषा प्रशिक्षण वर्गासाठी कागदपत्र पडताळणी शिबिर युनियन अध्यापक विद्यालय नगर येथे नुकतेच पार पडले.

जर्मनीतील बाडेन – वुटेनबर्ग राज्य व महाराष्ट्र शासन यांच्या दरम्यान झालेल्या सामंजस्य करारानुसार पहिल्या टप्प्यात दहा हजार कुशल मनुष्यबळ पुरवले जाणार आहे त्यानुसार आरोग्य सेवा, अतिथी सेवा, स्थापत्य सेवा व लॉजिस्टिक क्षेत्रातील विविध पदांसाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार ही कागदपत्र तपासणी पार पडली. ऑनलाईन अर्ज केलेले ७४ उमेदवार यासाठी उपस्थित होते.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर, वरिष्ठ अधिव्याख्याता, लक्ष्मण सुपे अधिव्याख्याता रामेश्वर लोटके मुकुंद दहिफळे लोटके यांच्या मार्गदर्शनाखाली ही पडताळणी झाली. त्यासाठी युनियन अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती सुनिता जाधव, तिमथी चांदेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चेतन दासनूर, प्राध्यापक सर्वश्री बाळासाहेब शेंडगे, भरत लोखडे, एस. बी. तुपे, संतोष शिंदे, सचिन शिंदे, सुनील जायमुडे, विनायक जाधव, संदीप काळे, शंकर टोपे, अरुण पालवे, प्रमोद उदावंत, निलेश तांबे, बद्रीनाथ आव्हाड, चंद्रशेखर साठे, फिरोज पठाण, साईनाथ खाजूने, ए. आर. चव्हाण, शशिकांत गिते, एल. एस. कुसळकर, श्रीमती मोनाली चौधरी यांनी विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी केली. यशवंतराव गाडे पाटील अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम पाहिले.

यातील निवड झालेल्या उमेदवारांना जर्मन भाषेचे प्रशिक्षण तसेच आवश्यक कौशल्य विषयक प्रशिक्षण देऊन रोजगारासाठी जर्मनीत पाठवले जाणार आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी जेट मशीनद्वारे पाणी मारून विशाल गणेश मंदिर परिसरात केली रस्त्यांची स्वच्छता

स्वच्छता ही सेवा अभियानात धार्मिक स्थळ स्वच्छता मोहीम

नगर – राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या स्वच्छता ही सेवा अभियानाचा दुसरा दिवस १९ सप्टेंबर रोजी पार पडला. या मध्ये विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग नोंदवला. पनवनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत जनजागृती करत माळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिर परिसर ते आंबेडकर चौक तसेच ऐतिहासिक माळीवाडा वेस या भागात स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

सीएसआरडी, प्रेमचंद गुगळे विद्यालयाचे विद्यार्थी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अभियानाच्या दुसऱ्या दिवशी परिसरात संपूर्ण स्वच्छतेसाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. जेट मशीनद्वारे पाणी मारून रस्ते स्वच्छ धुवून काढले गेले. प्लास्टिकसह इतर कचराही संकलित करण्यात आला.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी अभियानात सहभागी होऊन शालेय विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. तसेच, नागरिकांशी संवाद साधून स्वच्छतेबाबत सूचना दिल्या. तसेच, नागरीकांना येणाऱ्या अडचणीही जाणून घेतल्या. यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर यांच्यासह माणिकराव विधाते, बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, परेश लोखंडे व महापालिका कर्मचारी अभियानात सहभागी झाले होते.

महात्मा गांधी जयंतीनिमित्त मनपाच्यावतीने सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊन जेट मशिनद्वारे पाणी मारून माळीवाडयातील विशाल गणेश मंदिर परिसर स्वच्छ करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे आदी.

माजी जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी माजी विद्यार्थी म्हणून दादा चौधरी विद्यालयाला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. जयश्री ठोकर/नन्नावरे, मुख्याध्यापक श्री. येवले आदी.

माजी जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांची दादा चौधरी विद्यालयास भेट

नगर – माजी जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड द. गोंगले यांनी माजी विद्यार्थी म्हणून दादा चौधरी विद्यालयाला सदिच्छा भेट दिली असताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले की ह्रेष ह्रेष गुरू आहेत, मातृभाषेतून शिक्षण घेतल्यावर जगातील कोणतीही भाषा अवगत करता येते. विद्यार्थी जीवनात वाचनाची सवय लावून घ्यावी कारण त्याच्यासारखे समाधान नाही. वेगवेगळी पुस्तके वाचून विद्यार्थ्यांनी ती एकमेकांना द्यावी व वेळ प्रसंगी खरेदी करावी. तसेच त्यांनी सांगितले की मराठी भाषेतून शिक्षण घेतल्याचा अजिबात कमीपणा येऊ देऊ नका फक्त व्यावहारिक भाषा म्हणून इंग्लिशकडे लक्ष द्या. वाचनाने व्यक्तिमत्व घडवता येते. तसेच मानसिक व बौद्धिक वाढ होते. त्यांनी विद्यार्थी दशेमध्ये व्यायामाचे व संस्काराचे महत्त्व पटवून दिले.

सौ. जयश्री ठोकर/नन्नावरे, (मुख्याध्यापिका) व श्री. येवले (मुख्याध्यापक) यांनी याप्रसंगी शाळेला सदिच्छा भेट दिल्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

मोफत वेद पाठशाळेचा उपक्रम नव्या पुरोहितांसाठी उपयुक्त ठरेल

सुरेश क्षिरसागर यांचे प्रतिपादन

नगर –ब्राह्मण समाजाने कायम हिंदू संस्कृती, परंपरा जपल्या आहेत. हिंदू संस्कृती टिकण्यासाठी ब्राह्मण समाजाने एक होणे आवश्यक आहे. ब्राह्मण समाजाकडे धन नसले तरी ज्ञान आहे. या ज्ञानाच्या बळावर अनेक वादळांना समाजाने तोंड दिले आहे. हे ज्ञान इतर समाजांमध्ये वाटत आहे. राज्य सरकारने ब्राह्मण समाजासाठी परशुराम महामंडळाची घोषणा केली आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी समाजाचा दबाव यट निर्माण होणे आवश्यक आहे. समाजाच्या उन्नतीसाठी सर्वांनी एक होणे आवश्यक आहे. जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचा मोफत वेद पाठशाळेचा उपक्रम नव्या पुरोहीतांसाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन ऋग्वेद भावनाचे विश्वस्त सुरेश क्षिरसागर यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या श्री महर्षी वेद विद्यालय या मोफत वेद शाळेचे उद्घाटन करताना ऋग्वेद भावनाचे विश्वस्त सुरेश क्षिरसागर. समवेत उद्योजक राजकुमार जोशी, ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष किशोर जोशी, घनपाठी प्रतिकशास्त्री मुळे व नरेंद्रशास्त्री खिस्ती आदी.

अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या श्री महर्षी वेद विद्यालय या वेद पाठशाळेचे उद्घाटन सुरेश क्षिरसागर यांच्या हस्ते वेद मंत्रोच्चारात ऋग्वेद भवन येथे झाले. यावेळी उद्योजक राजकुमार जोशी, अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष किशोर जोशी, घनपाठी प्रतिकशास्त्री मुळे व नरेंद्रशास्त्री खिस्ती आदींसह पुरोहित वर्ग व नागरिक उपस्थित होते. या वेद शाळेतून विनामूल्य वेदांचे शास्त्रोक्त ज्ञान तज्ञ पंडितांकडून विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

किशोर जोशी म्हणाले, अहिल्यानगर ब्राह्मण संघाच्या वतीने धार्मिक व समाजोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून वेदांचा अभ्यास व वेदांचा प्रसार करण्यासाठी नवीन विद्यार्थी निर्माण व्हावेत यासाठी हे श्री महर्षी वेद विद्यालय सुरु करत आहोत. समाजाची सर्व प्रकारची उन्नती होण्यासाठी उत्तम वेदांचे ज्ञान असणारे, शास्त्रोक्त पौरोहित्य करणारे पुरोहित भावी काळात तयार व्हावेत हा वेद विद्यालय सुरु करण्यामागे उद्देश आहे. या पाठशाळेचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

प्रास्ताविकात दिनेश जोशी यांनी ब्राह्मण सेवा संघाच्या उपक्रमांची माहिती दिली. संगीत कुलकर्णी व शुभांगी केसकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी राजेंद्र देव, शहराध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, शहर उपाध्यक्ष ओमकार मुळे, चकोर मुळे, सोमनाथ मुळे व महेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

श्री महर्षी वेद विद्यालय या वेद शाळेचे उद्घाटन उत्साहात

शालेय १० मीटर एअर रायफल शूटिंग स्पर्धेत नगरमधील राजनंदिनी काळे जिल्ह्यात प्रथम

नगर – नुकत्याच वाडिया पार्क येथील शूटिंग रेंज वर झालेल्या जिल्हास्तरीय १० मीटर एअर रायफल शूटिंग स्पर्धेत राजनंदिनी काळे हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. तिने या स्पर्धेत एकूण २०० पैकी १९५ पॉईंट्स मिळवून हे यश प्राप्त केले. यामुळे तिचा आता विभागीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे.

राजनंदिनी काळे ही सेंट मोनिका येथील शूटिंग रेंज वर अहमदनगर रायफल ॲण्ड पिस्तोल शूटिंग क्लबवर सराव करते. तिला मुख्य प्रशिक्षक नेवासे येथील छबुराव काळे सर, ऋषिकेश दरंदले सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. ती सध्या ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कुल मध्ये इ. १० वी मध्ये शिकत आहे.

ती सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे व माजी नगरसेविका मनिषा बारस्कर – काळे यांची कन्या आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

गाळा भाड्याने /विकणे आहे
उत्तर-पश्चिममुखी फर्निचर सहित
8856871514

४०० स्क्वे.फूट ऑफिस भाड्याने देणे
सर्व सुविधांयुक्त पहिल्या मजल्यावरील ऑफिस, क्लिनिक, किंवा ब्यूटी पार्लरसाठी
नवीन हडको, एकवीरा चौक.
9518551830
9518795975

पाईपलाईन रोड टच १८०० स्क्वे. फूट
दुकान / शॉप, बँक, ऑफिस, पतरुसथा, हॉस्पिटल, सुपर शॉपी साठी भाडयाने देणे आहे.
9923228111

विकणे आहे
1520 स्क्वे.फु. जागा
753 बांधकाम (जुने)
पोलिस कॉलनी, कृष्णाण रोड, सावेडी, अ.नगर
9503671955

भाड्याने देणे
1BHK / 2BHK
3BHK / 4BHK
(फर्निश्ड)
प्राईम लोकेशन, मार्केटयार्ड, पारपत्तनर, अण्णाभाऊनगर हॉस्पिटल जवळ आणि, पूर्ण सावेडी एरिया मध्ये उपलब्ध.
संपूर्ण नगर शहरामध्ये
प्राईम लोकेशनला विक्रीसाठी प्लॉट व ट्रिन बंगलो, रोपरेट बंगला, प्लॉट उपलब्ध
9075717777

१३०० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे
मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतरुसथा, ऑफिसेस, दवाखाना,क्लासासाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098

मोक्याची जागा भाड्याने देणे
कार्यालय, लॅब, ई.व्यवसायासाठी मोक्याच्या चौकातील लब आणि पहिल्या मजल्यावरील जागा लिव्ह ॲंड लायनस्स कराराने उपलब्ध
कॅण्टल राजाभाऊ कुलकर्णी मार्ग जुना मार्कळवार बाजार, अ.नगर.
7770027505

CHANGE IN NAME
My Old Name Was
ZAHEER ALI PATHAN
My New is
ZAHIR ALI PATHAN
It will be used for all future purposes

ॲपल ॲंड ॲंड्रॉईड सेकंड हँड मोबाईल योग्य दरात खरेदी विक्री
सबसे नेक्स्ट क्वॉलिटी मे बेस्ट
जय मोबाईल शॉपी
सिध्दीबाग समोर, न्यू आर्टस् कॉलेज रोड, अ.नगर
9096108690 | 9270570699

आडतेबाजार येथे दुकान कामासाठी
लेडीज/मुलगी पाहिजे
शिक्षण कमीत कमी १२ वी
8657995555
8275033335

बॅंकेच्या टेली कॉलिंगला मुले आणि मुली पाहिजेत
– २५ जागा
आदित्य प्लाझा ऑफिस,२०६, दुसरा मजला, ओले हॉस्पिटल शेजारी, सावेडी, अ.नगर.
8888841388
9284564352

नामांकित टाईल्स्च्या शोरूममध्ये अकौंटंट पाहिजे
हॅलीचे ४ ते ५ वर्षांचा काम केल्याचा अनुभव आवश्यक
लेडिज/जेन्टस्
Excel व Tally ची ज्ञान असणाऱ्यांनी संपर्क साधावा
डी-मार्ट जवळ, नगर-मनमाड रोड, सावेडी, अ.नगर
9590151515

पेस्ट कंट्रोल कामासाठी मुलगा पाहिजे
स्वताची बाईक/ लायसन्स आवश्यक
नॅशनल पेस्ट मॅनेजमेंट, नागापूर, बोल्हेगाव फाटा, अ.नगर.
9404236274
8329447598

त्वरित पाहिजेत
- अकौंटंट (लेडीज) : १
- हेल्पर (लेडीज) : २
- सेल्समन (जेन्टस) : १

: अर्जासह समक्ष भेटा :
महावीर एन्टरप्राईजेस इंडस्ट्रीअल इस्टेट केडगाव,अ.नगर
9665670002

पाहिजेत
- कॉम्प्युटर ऑपरेटर कम कॅशियर(पूर्णवेळ)

कापड दुकानातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
जरीवाला
कापड बाजार,अहमदनगर.
मो.7666510765

होलसेल मेडिकल दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजे
अनुभवीस प्राधान्य आकर्षक पगार
7277917777
7277775757

त्वरीत पाहिजेत
- मावशी (आया)- २ (स्वयंपाकीणी)
- ओ.टी. असिस्टंट- १ (पुरुष)
- फार्मासिस्ट- १

संपर्क :- हॉटेलीक हॉस्पिटल व प्रसुतिगृह
शिवम इस्टेट, तारकपूर, एस.टी.स्टॅंड, सफेद, अ.नगर
(भेटण्याची वेळ दु. १२ ते ३)
7769959721

मार्केटिंग कंपनीसाठी मार्केटिंग ऑफिसर पाहिजे
शिक्षण-पदवीधर मार्केटिंग क्षेत्राचा अनुभव असावा फिरायची तयारी असावी
* ऑफिस मॅनेजर शिक्षण-पदवीधर
गुरुदत्त मार्केटिंग - 8796929893
नगर-पुणे रोड,केडगाव, अ.नगर.

फुल टाईम अकौंटंट पाहिजे
''xml फॉर्मेट'' मध्ये डाटा ईम्पोर्ट-एक्सपोर्ट करता आला पाहिजे.
अनुभवीस प्राधान्य. । आकर्षक पगार
(अर्जासह समक्ष भेटा किंवा अर्ज व्हॉट्स्अॅपवर पाठवा)
भारतगॅस आनंद भारत गॅस एजन्सी
भारत गॅस वितरक
१,२ स्नेहल अपार्टमेंट, डी.मार्टजवळ, पाईपलाईन रोड, सावेडी,अहमदनगर
Email :anandgasagency2007@gmail.com, Mo : 9146510809

महावीर कन्स्ट्रक्शन
त्वरित आवश्यकता
आकर्षक पगारासह नगर लधील मोठ्या रियल इस्टेट कंपनीसाठी काम करण्याची संधी
Expert Salesperson Full Time — 4
ग्रॅन्ज्युएशन आवश्यक
बुलाव CV या मेल आयडी वर पाठवा
mahavirconstruction2020@gmail.com
MAHAVIR GROUP
6th Floor, Arhampirna, Near Gov Polytechnic College, Burudgaon Road, Ahmednagar - 414001

पाहिजेत
* सेल्सगर्ल- 9
(आवश्यक पगार)
आदेश्वर किड्स वेअर
मॅकेअर हॉस्पिटल जवळ, सावेडी, अ.नगर.
8308228479

त्वरित पाहिजेत
तारकपूर येथील कार्यालयात ५ जागा मुलींसाठी गरजे आहेत.
संगणक ज्ञान, एक्सेल प्रोग्राम व इ-कार्यालय तसेच मराठी/इंग्लिश टायपिंग आवश्यक
अनुभवी असल्यास प्राधान्य
संपर्क
94220 80597

पाहिजेत
चिंतामणी हॉस्पिटल, बालिकाश्रम रोड करिता
सिस्टर-३
वॉचमन-२
दिवस व रात्रपाळीसाठी
: संपर्क :
9422343110
(0241) 2323914

फ्रेशर फार्मासिस्ट पाहिजे
नेप्ती रोड, केडगाव येथे मेडीकलसाठी
9763767767

घरकामासाठी बाई पाहिजे
9604095060

पाहिजेत
सेल्समन- १
सेल्सगर्ल - २
- अर्जासह समक्ष भेटा -
गरुड फुड्स्
कोहिनूर प्लाझा, पटवर्धन चौक, लोकमत भवन शेजारी, अ.नगर

मेडिकलसाठी पाहिजेत
* फार्मासिस्ट -३
* अकौंटंट - २
फुलटाईम/पार्टटाईम
9011113336
9322578243

फील्ड टेक्निशियन पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटिंगचे ज्ञान असणे आवश्यक आहे
- पात्रता -
१२वी पास/Diploma
कामाचे ठिकाण:- अहमदनगर
स्वत:ची बाईक असणे आवश्यक आहे
9860805244

पाहिजेत
महिला/पुरूष कामगार - २०
आकर्षक पगार व बोनस
एका नामांकित कंपनीसाठी
PLOT NO. C-20240, NEAR MIDC, AHMEDNAGAR
9890999370
9284039694

इलेक्ट्रिक फिल्ड मधील अनुभवी मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह पाहिजे- मुले/मुली
Akon India Sales Corporation
9823067545 | 8007878097

अंतिम सभा नोटीस
अबधुत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., निर्मलनगर, सावेडी, अहमदनगर या अवसायनातील सहकारी संस्थेचे सर्व सभासद, कर्जदार व हितचिंतक यांना कळविणे बरे की, सदर संस्थेची अवसायनाची अंतिम सभा खालील विषयांवर संस्थेच्या अवसायक यांच्या कार्यालयाची **दिनांक २९/९/२०२४ रोजी सायं. ठिक ५ वाजता संस्थेच्या आवारात** ठेवण्यात आलेली आहे. तरी सदर सभेत न चुकता संस्थेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे.
विषय : १) संस्थेच्या अंतिम आढेशानंरच व्यवहाराची नोंद घेणे. २) संस्थेची अंतिम लेखापरीक्षणापासाची लेखापरीक्षक यांची नेमणुक करणे. ३) संस्थेची नॉदणी रद्द करणेबाबत चर्चा करणे. ४) संस्थेचे विसर्जनाचे कामकाज आटोपल्यावर शिल्लक राहिलेली रक्कम, वाढावा विनियोग संबंधी विचार करणे. ५) विसर्जक यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.
व्ही.पी.आठकूटे
अवसायक
अवधुत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., निर्मलनगर, सावेडी, अहमदनगर
दिनांक : ९१/९/२०२४

अंतिम सभा नोटीस
अमित बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी सहकारी भा. मा. गृहनिर्माण संस्था मर्या., सावेडी, अहमदनगर या अवसायनातील सहकारी संस्थेचे सर्व सभासद, कर्जदार व हितचिंतक यांना कळविणेत येते की, सदर संस्थेची अवसायनाची अंतिम सभा खालील विषयांवर संस्थेच्या अवसायक यांच्या अध्यक्षतेखाली **दिनांक १५/९/२०२४ रोजी सायं. ठिक ५ वाजता संस्थेच्या आवारात** ठेवण्यात आलेली आहे. तरी सदर सभेत न चुकता संस्थेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे.
विषय : १) संस्थेच्या अंतिम आढेशानंरच व्यवहाराची नोंद घेणे. २) संस्थेची नॉदणी रद्द करणेबाबत चर्चा करणे. ३) संस्थेचे विसर्जनाचे कामकाज आटोपल्यावर शिल्लक राहिलेली रक्कम, वाढावा विनियोग संबंधी विचार करणे. ४) विसर्जक यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.
व्ही.पी.आठकूटे
अवसायक
अमित बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी सहकारी भा.मा. गृहनिर्माण संस्था मर्या., सावेडी, अहमदनगर
दिनांक : ९१/९/२०२४

BDP EVENT
तप्रसोहळ्यात जपा संस्कृती व परंपरेचा साज.. वधू-वरांच्या आगमनाचे रथ बुक करा आज..
* श्री तुळजाभवानी रथ * श्री राजगड रथ * श्री विशाल गणपती रथ
* श्री स्वामी समर्थ रथ * श्री अष्टविनायक रथ * श्री पद्मावत रथ
* वारकरी रथ * शेलकरी रथ * कोटूबिक रथ
दिल्ली गेट, अहमदनगर 8329678804

कोटेशन सुचना
अहमदनगर छावणी परिषद, अहमदनगर क्षेत्र व परिसरातील सर्व लोकांना या सुचनेद्वारे कळविण्यात येते की, खालील दर्शविलेल्या बाबींचा ठेका मोहरबंद कोटेशन पध्दतीने छावणी परिषदेने देण्याचे ठरविले आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी खालीलप्रमाणे कोटेशन मागवत आहे.

अ. क्र.	तपशील	छावणी क्षेत्रामध्ये फटाक्यांचे स्टॉल लावणे. १० X १० ची फुटाने	९० दिवस, दि. २६/१०/२०२४ ते ०५/११/२०२४	रु. २०००/-	रु. २००/-
०१					

छावणी परिषद कोटेशनची कुठलीही बोली स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क राखुन ठेवत आहे.
कोरे कोटेशन फॉर्म छावणी परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत रु. २००/- भरुन दिनांक ३०/०९/२०२४ रोजी पर्यंत उपलब्ध राहतील. भरलेले मोहरबंद कोटेशन फॉर्म दोन पाकीट पध्दतीने दि. ०१/१०/२०२४ दुपारी ३.०० वाजेपर्यंत छावणी परिषद कार्यालयातील निविदा पेटीत जमा करावेत.
सदरहु स्टॉलसाठी छावणी परिषद, अहमदनगर यांचेमार्फत जागा दिली जाईल. त्याशिवाय छावणी परिषद क्षेत्रातील अन्यत्र कोठेही फटाके व तत्संबंधी स्फोटक वस्तु विक्रीसाठी ठेवण्यात आल्यास पूर्वसूचना न देता सदरचा माल जप्त करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.
(विक्रांत मोरे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
छावणी परिषद, अहमदनगर

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training
MAHA offer DiSCOUNT
Just in 1800 Any Course
JOIN TODAY
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR, INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshar Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Mallwada Stand, Station Road, Ahmednagar, 414001
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

जाहीर नोटीस
तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीवदल विद्यमान मालक विठोबा व्यवहार आमचे अशिलाबरोबर तरविलेला आहे. सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही बाधू वाद असल्यास खक्षेपास, अव्वल जशी, बँक, वित्तीय संस्था अगर सोसायटीचा कर्ज बोजा नही जानिन तारण नही तसेच सदर मिळकतीबाबत भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्ताने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे कोही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली.
मिळकत वर्णन
जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी जिल्हा परीषद हद्दीतील **मौजे भोगी** येथील ५) **सर्व्हे नं. १८७/२** यांचे एकुण क्षेत्र ५ हे ०६ आर हि संपूर्ण शेतजमीन मिळकत व (२) **सर्व्हे नं. १८७/३** यांचे एकुण क्षेत्र १ हे ०६ आर यापैकी पूर्व बाजुकडील क्षेत्र जमीन मिळकत यांचे क्षेत्र ० हे. ३५ आर हि मिळकत **यांची एकत्रित चतुःसिमा पुर्वेस :** सर्व्हे नं. ११९, **दक्षिणेस :** सर्व्हे नं. १८७/७ गटील बाजु हिरगाव झंगेले व इतर तसेच सर्व्हे नं. १८७/४ गटील रेखा हरेचाल तलरेजा व इतर यांची मिळकत **पश्चिमेस :** नेप्ती रोड, **उत्तरेस :** सर्व्हे नं. १८७/३ ५. रनेश गालस्या बत्तीन व सर्व्हे नं.१८७/६ तसचंद्र बोरके यांची मिळकत
विशाखा आरफळ : आमहेच महतु होळकर रा : भोगी फाटा भोगी, अहमदनगर
दि. २०/०९/२०२४
अहमदनगर

अॅड. उषा राजाराम जगताप (पटेल)
सदर - हुळ भी बंगलो, आदर्श कॉलनी, एम बी एस सी बँक जवळ, शेवेकर चौक, सावेडी, अहमदनगर मो नं. ८८८८८८१९१९

जाहीर नोटीस
तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री सुजित वसंतराव पाटील, राहणार : वासुंदे, तालुका : पारनेर, जिल्हा : अहमदनगर यांच्या स्वकष्टार्जित उत्पन्नातून खरेदी मालकी हक्काची व वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमच्या आशीलांना कायमच्या खरेदी देण्याचे ठरविले असून विसारपोटी रक्कमही स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वाध व निजोजीमि असल्याचा विक्रय व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या आशीलांना दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये अथवा फसवणुक होवु नये म्हणून मुद्दामहून सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहे. तरी कोणत्याही व्यक्ति की, सदर मिळकती बाबत कोणतीही तक्रार अगर हरकत, कोणताही बाधू वाद, दावा असल्यास, मनाई हुकूम स्थगिती, गहाण, बँक बोजा, जप्ती, चार्ज, लिन, दान, बक्षीस पत्र, भाडेकरार, साठेकरार, मदार, पोटगी, इजमेंट अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध अथवा अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्तने योग्य त्या कागदपत्रांच्या पुरावासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास ज्याचे कही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नही याची नोंद घ्यावी.
परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन - कि ।। अहमदनगर सब डी ।। तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे वाहुराणा बु। येथील स. नं. ६१/६२/६३/९/२/६४/६५ मधील प्लॉट नं १५ हिस्सा नं १८५ याचे एकुण क्षेत्रफळ २८९.९५ चौ.मी. (२.८९.९५ आर. चौ. मी) हा संपूर्ण खुला बिनवसती प्लॉट मिळकत. या संपूर्ण चतुर्सीमा पुढील प्रमाणे
पुर्वेस : प्लॉट नं ७३ दक्षिणेस : प्लॉट नं ३१
पश्चिमेस : रस्ता उत्तरेस : प्लॉट नं ३४
येथेप्रमाणे चतु:सीमापूर्वक प्लॉट मिळकत (यदा कदाचित सदर चतु:सीमा चुकीच्या आढळल्यास चेन्मू रेकॉर्डे प्रमाणे असलेल्या चतु:सीमा बरोबरच्या समजण्यात याव्यात). त्यातील जल, तरू, झाडेझुडपे, गौनखनीज, वहिवाट वागणुकीच्या सर्व हक्कांसह, तदंगभूत वस्तूंसह काहीही एक राखून न ठेवता.
दि. २०/०९/२०२४ अॅड. एस. एल. आसावा,
अहमदनगर चेंबर नंबर १०९, लॉयर्स चेंबर्स,
जुने जिल्हा न्यायालय आवार, अहमदनगर

महाराष्ट्र शासन
रो.ह.यो. (कार्य). विभाग अहमदनगर
पत्ता :- बांधकाम भवन, नगर- औरंगाबाद रोड, अहमदनगर
ई-मेल पत्ता :- egsahmednagar.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक ०२४१-२४३२९३८

ई-निविदा सुचना क्रं. १३ सन २०२४-२०२५
कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहमदनगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन खाली नमूद केलेल्या कामासाठी निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार संचेच आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमधे भाग घेवू शकेल. खालील कामांकरीता ४-१ नमुनाजीत निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता रो.ह.यो.(कार्य). विभाग अहमदनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र	कामाचे नांव	अंदाजित रक्कम (लाखात)	नोंदणी वर्ग
१	अ) भगुर ते वहूले दु. इजिमा-२४६ लहान पुलासह रस्त्याचे काम करणे.. ता. शेवगाव, जि. अहमदनगर. ब) मौजे भगुर ता. शेवगाव, अंतर्गत कच्चा रस्त्याचविण (इजिमा- २४६) पूलाचे बांधकाम करणे. ता. शेवगाव जि. अहमदनगर	७०.४२	वर्ग ४ अ व त्यावरील
२	गढेवाडी फाटा ते गढेवाडी रस्ता इजिमा-८१ रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे, ता. शेवगाव जि. अहमदनगर	४२.२४	वर्ग ५ व त्यावरील
३	रांजणी फाटा ते मेघे वस्ती इजिमा-२४४ रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.	२४.९०	वर्ग ६ व त्यावरील
४	मौजे नगिना बाभुळगांव, शेवगांव येथील लक्ष्मीमाता मंदिरसमोर ज्ञानवंगाचा मालमत्ता १२.३३ क्र. २८७ ते मोकळया जागेत सभागंधव बांधणे, (पत्राशेड वगळून) ता. शेवगाव, जि. अहमदनगर (लेखाशिर्ष-४५१५ आमदार विकास निधी)	१२.३३	वर्ग ६ व त्यावरील
५	गंगाळगुट ते गोरलगाव रस्ता किमी. ०/०० ते ३/०० इजिमा क्र. १८३ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.	१६.३७	वर्ग ५ अ व त्यावरील
६	खलाजवगुट ते दिघी नजिक विंचोली ते लखवी रस्ता किमी ४/०० ते १२/०० इ.जि.मा. २४.३९ २३८ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.. ता. नेवासा	२४.३९	वर्ग ५ अ व त्यावरील
७	इजिमा ३५३ ते खोडसे वाजळी रस्ता कि.मी. ०००/ ते १/५०० ग्रा.मा. ३५ मजबुतीकरण १२.२० व डांबरीकरण करणे. ता. नेवासा	१२.२०	वर्ग ६ व त्यावरील
८	घोडेगाव ते राजेगाव रस्ता कि.मी. २ ते ०७/६//०० ग्रामा. १०४ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता.नेवासा.	१६.२४	वर्ग ५ अ व त्यावरील
९	येवराई ते गिडेगाव रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० ग्रामा १७३. मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. नेवासा	१५.९०	वर्ग ५ अ व त्यावरील
१०	रा.मा. ५० भेंडा फॅक्टरी ते जेउर तेलकुडगाव रस्ता कि.मी. ५/०० ते १०/५०० इ.जि.मा.२३९ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. नेवासा	१६.१४	वर्ग ५ अ व त्यावरील
११	भेंडा कारखाना ते रांजणगाव कि.मी. १/५०० ते ४/० ग्रा.मा. १९२ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. नेवासा	१६.५१	वर्ग ५ अ व त्यावरील
१२	सांगवी ते बरगमुंद रस्ता कि. मी. ०/०० ते २/०० ग्रा. मा. १२३- मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. नेवासा	१६.४८	वर्ग ५ अ व त्यावरील
१३	तेलकुडगाव ते भातकुडगाव रस्ता कि. मी. ०/०० ते३/०० ग्रामा क्र. २०२ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. नेवासा	१५.७०	वर्ग ५ अ व त्यावरील
१४	पाथोगेव चिंचवी रस्ता कि.मी. ०/०० ते २/०० इजिमा क्र. ३२१ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. नेवासा	१७.०१	वर्ग ५ अ व त्यावरील
१५	प्र.जि.मा. ३२ ते बेलुंबेव्यवाडी ते सोनई रस्ता किमी. ३/०० ते ६/०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. नेवासा	१६.८७	वर्ग ५ अ व त्यावरील
१६	रा.मा. ६६ ते पानसवाडी झापवाडी वाघवाडी वांजोळी रस्ता किमी. क्र. ३/०० ते ८/०० इजिमा १८५ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. नेवासा	१७.०१	वर्ग ५ अ व त्यावरील
१७	लोखंडी फॉल ते पाथोगव रस्ता किमी. क्र.१/०० ते ५/०० इजिमा क्र. २३३ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. नेवासा	१७.०१	वर्ग ५ अ व त्यावरील
१८	कांगोणी ते पोहेगाव रस्ता किमी. क्र.१/०० ते १०/०० ग्रामा. क्र. १९९ खडीकरण करणे ता. नेवासा	१७.०८	वर्ग ५ अ व त्यावरील
१९	खेडले परमानंद ते घनगेव्वा रस्ता किमी. ०/०० ते २/५०० ग्रामा. क्र. २२२ खडीकरण करणे, ता. नेवासा	१२.८१	वर्ग ६ व त्यावरील
२०	नारायणवाडी ते यनगरवाडी रस्ता किमी. क्र. २/०० ते ३/०० ग्रा.मा. क्र. २३० मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. नेवासा	१७.०१	वर्ग ५ अ व त्यावरील
२१	भालगांव इ.जि.मा. ३२१ ते तगपूरे वस्ती रस्ता किमी. ०/०० ते १/०० ग्रामा. १७ खडीकरण करणे, ता. नेवासा.	२५.६०	वर्ग ५ अ व त्यावरील
२२	ब्राम्हणगाव काळे भांड वस्ती ते बोधेगाव रस्ता ग्रा.मा २०१, मजबुतीकरण करणे ता. राहुरी जि. अहमदनगर	१६.८८	वर्ग ५ अ व त्यावरील
२३	कोल्हार बु ग्रामपंचायत समोर वस्ती ते महादेव मंदिर आदिवासी कलमिळते जाणारा रस्ता ग्रा.मा. १४ मजबुतीकरण करणे. ता. राहुरी जि. अहमदनगर	१६.८७	वर्ग ५ अ व त्यावरील
२४	शिळापूर ते वांगी खु रस्ता (ग्रा. मा. ९७, मजबुतीकरण करणे. ता. राहुरी जि. अहमदनगर	१६.८१	वर्ग ५ अ व त्यावरील
२५	नगमाळ नगर रस्ता ते देवळाली (इजिमा-५३) किमी. २.०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, ता. राहुरी जि. अहमदनगर	२५.२१	वर्ग ५ अ व त्यावरील
२६	चितळवाडी ता. पाथर्डी येथील हनुमान मंदिरासमोरील ग्रामपंचायत मिळकत क्र. १ पर मोकळया जागेत सभागंधव बांधणे. ता. पाथर्डी, जि. अहमदनगर. (पत्राशेड वगळून) लेखाशिर्ष- ४५१५ आमदार निधी)	१२.८०	वर्ग ६ व त्यावरील
२७	गोजे. पाथर्डीतील देवीहा ग्रामपंचायत मिळकत क्र. ५४६ हर सभागंधव बांधकाम करणे, (पत्राशेड वगळून) ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.	१२.८०	मजुर सहकारी संस्था

ई-निविदा उपलब्ध कालावधी	:-	दिनांक : २३/०९/२०२४ ते दिनांक ३०/०९/२०२४
निविदापूर्व बैठक	:-	दिनांक
ई-निविदा उघडणे	:-	दिनांक : ०१/१०/२०२४

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. www.mahapwd.com 2. mahatenders.gov
(सदर निविदेसुधनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहमदनगर कार्यालयातील सुचना फलक
जा.क्र. लेखा/निविदा/ ४२५६ / सन २०२४
कार्यकारी अभियंता, सांचे कार्यालय,
रो.ह.यो. (कार्य). विभाग,
अहमदनगर दिनांक : ९८/०९/२०२४
कार्यकारी अभियंता,
रो.ह.यो. (कार्य) विभाग,
अहमदनगर